# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ८०**

वर्ष पाचवे / अंक ५ / एप्रिल २००४

## संपादकीय

# नोबेल चोरी (!)

या आपल्या (प्रिय) देशात कधी काय आणि का होईल, हे सामान्य माणसाच्या आकलनापलीकडे आहे. 'भांडारकर ओरिएण्टल' वरील हल्ला ही बातमी धाडकन आली आणि मनासकट सर्व मती गुंग झाली. या प्रकरणाचा हवा तसा फायदा उठविणारे राजकीय पुढारी (?) तारे तोडत फिरत असतानाच अशीच सर्वस्वी अस्वस्थ करणारी 'नोबेल चोरी' नामक बातमी धडकली.

इतिहासाचा अभिमान असणाऱ्या आमच्यातील एका सुशिक्षित स्नेह्याने सांगितले, 'या निमित्ताने ही टागोरांची भानगड तरी कळली...(?) तर आहे हे असं आहे. टागोर कोण होते, हे समजायला त्यांच्या प्रार्थनासंग्रहाला मिळालेला नोबेल पुरस्कार चोरीला जावा लागतो !

गुरुदेव टागोरांची पिढीच संपली हे बरे झाले, असे वाटावे अशी ही प्रतिक्रिया. शांतीनिकेतनाचे स्वप्न पाहणारे, प्रत्यक्षात आणणारे शिक्षणप्रेमी, रवींद्रनाथ, काबुलीवाला लिहिणारे रवींद्रनाथ, रवींद्र आर्ट ज्यांच्या नावे जगभर ओळखली, अभ्यासली, ते रवींद्रनाथ... पु. लं. सारख्या रसिकाग्रणीलाही ज्यांच्या शांतिनिकेतनाने मोह पाडला, असे रवींद्रनाथ आणि हो, नोबेल मिळविणारे पहिले भारतीय रवींद्रनाथ ....

अशा महान माणसाच्या प्रतिभेतून निर्माण झालेल्या गीतांजलीला मिळालेला नोबेल पुरस्कारच चोरीला जावा? किती वेळा 'आपण चाललो आहोत तरी कुठे?' असं विचारात राहायचे ! स्वातंत्र्योत्तर काळातले सर्वच दिवस या अगतिक प्रश्नाच्या क्षितिजावर उगवताहेत.

पुरस्कार देणारे गल्लोगल्ली आणि घेणारेही गल्लोगल्ली अशा आजच्या वातावरणात 'नोबेल' चोरीला जातं याबद्दल काय वाटणार म्हणा? पुन्हा सत्तेची साठमारी करायला निघालेले शिकारी जनतेचं रान जागं करीत फिरताहेत, जनताही भाषणं ऐकण्यात रमून गेली आहे... नोबेल चोरणाऱ्याने या परिस्थितीचा तर फायदा (की गैरफायदा) उठवला नसेल?

# आवाहन


'दिशा'साठी आपण जाहिरात देऊन सहाय्य करावे, असे आवाहन आहे. या कार्याचे महत्त्व लक्षात घेवून आपण आमच्या आवाहनास प्रतिसाद द्याल, ही नम्र अपेक्षा !

| जाहिरातीचे दर | | |
|---|---|---|
| **कव्हर पेज २, ३** | | ३,०००/- |
| **कव्हर पेज ४** | | ५,०००/- |
| **आतील पृष्ठ** | १) पूर्ण पृष्ठ | १,५००/- |
| | २) अर्धे पृष्ठ | १,०००/- |
| | ३) पाव पृष्ठ | ५००/- |

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**

दूरध्वनी : २५४२ ६२७०




**वर्ष पाचवे / अंक ५ / एप्रिल २००४**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ८ वे / अंक १०वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | दहावा दीक्षान्त समारंभ, दिनांक १० मार्च २००४ प्रमुख पाहुणे डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे दीक्षान्त भाषण | - | ३ |
| २) | भगवान श्रीकृष्ण | शं.बा. मठ | ९ |
| ३) | प.पू. पांडुरंगशास्त्री आठवलेजी यांची प्रवचने ॥ गीतामृतम् ॥ | आशा भिडे | १४ |
| ४) | हस्तलिखितांची परंपरा व भारतातील हस्तलिखित संग्रह करणारी ग्रंथालये | अर्चना पुजारी | २३ |
| ५) | मराठीतील समस्याप्रधान नाटके : एक विचार | सुधाकर फडके | २७ |
| ६) | पुस्तक परिचय - संथ सलील मंद लहर | गीतेश गजानन शिंदे | ३० |
| ७) | अगस्त्य ऋषी | अनंत हरी पटवर्धन | ३२ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ४० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ६० वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व संगणक अभ्यास केंद्र अशी सर्वांगीण शिक्षणाची व्यवस्था संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून संस्था विविध उपक्रम राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धात उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात कार्यप्रवण आहेत.

आज टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. उद्याचे नागरिक बनणाऱ्या संस्कारक्षम विद्यार्थ्यांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने 'दिशा' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

आपण या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती ! तसेच आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी/जाहिरात वा देणगीची रक्कम चेकने पाठवावी.

चेक **"विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा"** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

सदर अंकाची किरकोळ विक्रीची किंमत **रु. २५/-** फक्त.

*वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी सह कळवावा.*

## दहावा दीक्षान्त समारंभ, दिनांक १० मार्च २००४

# प्रमुख पाहुणे डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे दीक्षान्त भाषण

*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या दहाव्या दीक्षान्त समारंभातील डॉ. माशेलकरांचे भाषण विद्यापीठाच्या प्रा. चंद्रकांत भोंजाळसरांच्या सहकार्याने 'दिशा'च्या वाचकांसाठी देत आहे. - संपादक*

एकविसावे शतक हे 'ज्ञानाचे शतक' आहे, हे आपल्या प्रत्येकाला माहीत आहे. सध्याच्या जगात ज्या राष्ट्रांनी ज्ञान-निर्मितीत नैपुण्य मिळवून त्याचा प्रसार केला आहे आणि ज्ञानाचे समृद्धी व समाजस्वास्थ्यात रूपांतर आणि संरक्षण केले आहे, तेच नेतृत्वाच्या योग्यतेचे समजले जातात. नवनिर्मितीशिवाय ज्ञानाला किंमत नसते हे आपण ओळखले पाहिजे. परिवर्तनाच्या क्रियेतूनच नवीन ज्ञान निर्माण करता येते. ज्ञानाचा संपत्ती व समाजस्वास्थ्यात रूपांतर करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे, 'नवपरिवर्तन' होय.

कित्येक शतकांपूर्वी नवीन योजना आखण्यात भारत हा अग्रेसर होता. ५००० वर्षांपूर्वीच्या सिंधू संस्कृतीपासूनचा तो भारतीय संस्कृतीचा आणि विकासाचा पाया होता. आपल्या या योजना वैविध्यपूर्ण आणि नवीन पायंडा पाडणाऱ्या व मार्गदर्शक होत्या.

शहरांचे वैशिष्ट्यपूर्ण नियोजन, घरांच्या वस्त्यांत प्रमाणबद्ध भाजलेल्या विटांचा वापर, एकमेकांना जोडलेली सांडपाण्याची व्यवस्था, फिरत्या चाकावर तयार केलेली मातीची भांडी, भरीव चाके असलेली गाडी यांचा समावेश होतो. लोथलच्या गोदीसारखी एवढी मोठी समुद्रबांधणी कांस्य युगात कोणत्याही समाजाने क्वचितच केली असेल. भारतीयांचा शून्याचा शोध, दशांश चिन्हांकित किंमत रचना या वैदिक काळातल्या आहेत. बीजगणित, त्रिकोणमिती व भूमिती यांतील आपले काम खरोखरच लक्षात येण्यासारखे होते. वैद्यकीय क्षेत्रातील विशेषत: आयुर्वेदातील नवनवीन उपक्रमांचा उद्देश केवळ रोग बरे करण्यापुरता सीमित न राहता आरोग्य जतन करण्याच्या महत्त्वापर्यंत व्यापक होता. शस्त्रक्रियेतील नवीन उपक्रमांत उदाहरणार्थ, लॅप्रोटोमी, मूतखड्याच्या व प्लॅस्टिक सर्जरीतून विकृती बरी करण्याच्या शस्त्रक्रियांमध्ये भारतीयांनी घेतलेले अपार कष्ट निश्चितच मार्गदर्शक आहेत. आपण १५०० वर्षांपूर्वी धातुशास्त्रात जे काही साध्य केले त्याचा पुरावा म्हणजे दिल्ली येथील लोहस्तंभ होय. शतकानुशतके न गंजता उभा असलेला हा स्तंभ धातुशास्त्रज्ञांचा स्फूर्तिस्तंभ आहे. इतरांपेक्षा प्रगत दर्जा असलेले शास्त्रशुद्ध विचार, कर्तृत्व व अत्यंत कौशल्यपूर्वक काम करण्याच्या गुणधर्मांनी भारतीय संस्कृती समृद्ध आहे.

एवढा मोठा वारसा व यशाची दीर्घ परंपरा असतानाही येणाऱ्या शतकात भारत मागे का पडला, हे एक गूढ आहे. काही शतकांपूर्वी पश्चिमेकडे विज्ञान व औद्योगिक क्रांती होत असताना भारतात मात्र सुस्तीचा काळ होता. या काळातील सुस्तीचे फळ म्हणजे धर्मसत्तांचे आगमन, असमंजस काल्पनिक विचार, अंधश्रद्धेचा पाया, तथाकथित धार्मिक विधींचे स्तोम हे होय. या काळात पूर्वीच्या उदात्त परंपरांचा ऱ्हास होऊन सरंजामशाही पद्धतीचा समाज निर्माण झाला. अशा स्थितीत भारत वसाहतवाद्यांच्या अंमलाखाली आला. विसाव्या शतकाच्या आरंभी विज्ञानात काही प्रमाणात प्रगती होऊ शकली; कारण भारत स्वतंत्र होण्यापूर्वी ७५ वर्षे, कुशाग्र बुद्धीच्या काही भारतीयांनी अपार कष्ट घेतले होते. अशा विचारवंत भारतीयांमध्ये सर सी.व्ही.रामन, एस्. रामानुजन, जे.सी.बोस, एस्.एन्. बोस, पी.सी.रे, वगैरेंचा समावेश होतो. ही भारतीय समाजाच्या आंतरिक ऊर्मीची फलश्रुती होती, त्यामुळेच स्वातंत्र्य चळवळीलाही चालना मिळाली. विसाव्या

शतकात इतर देशांच्या तुलनेने भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात असलेला कर्मठपणा व रूढिप्रियता दिसून येते. त्यामुळेच आपले अग्रस्थान संपुष्टात आले. २१ व्या शतकात हे तसेच पुढे चालू राहता कामा नये. तेव्हा आपण आपले अग्रस्थान परत मिळविणारच, असा निश्चय करूया. नवभारताच्या पुनरुत्थानासाठी आपणाला आता संधी आली आहे. आपण काय करायला पाहिजे? नवनिर्मितीला अनुकूल असणाऱ्या नवीन सामाजिक, वैधानिक व आर्थिक संरचना उभ्या करणे गरजेचे आहे. इंडियातील 'आय' हा इनोव्हेशनमधील 'आय' केला पाहिजे. माझी खात्री झाली आहे की, विदेशी शक्तींच्या पकडीतून सुटण्यासाठी ज्याप्रमाणे आपण 'स्वातंत्र्य चळवळ' सुरू केली होती, त्याचप्रमाणे आता आपण 'भारतीय परिवर्तनाची चळवळ' (इंडियन इनोव्हेशन मूव्हमेंट) सुरू केली पाहिजे. अशी चळवळ भारताला राष्ट्राराष्ट्रांतील सलोखा राखण्याच्या कामात योग्य ते स्थान मिळवून देईल. त्यासाठीची वेळ आत्ताची आहे, म्हणजेच नवीन सहस्रकाच्या पहाटेची आहे.

आपल्या स्वप्नातील नवभारत उभारणीबद्दल आपल्यात निर्माण झालेला आत्मविश्वास हा आपल्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील महत्त्वाच्या यशांमुळे आहे. या यशानेच आपल्या राष्ट्राला वेगळेपण प्राप्त झाले आहे. नीलक्रांती (अवकाश), हरितक्रांती (शेती), श्वेतक्रांती (दूध) आणि ग्रेक्रांती (सॉफ्टवेअर) ही त्यापैकी काही ठळक उदाहरणे आहेत. भारतीय अवकाश कार्यक्रमाचे आपणास उदाहरण घेता येईल. अन्य गोष्टींप्रमाणेच भारताने अवकाशात उपग्रहमालिका सोडली आहे. त्यात एशिया-पॅसिफिक विभागातील सर्वात मोठ्या देशांतर्गत संदेश दळणवळण यंत्रणेचा समावेश होतो. अवकाश कार्यक्रमात आपण प्रक्षेपक वाहनेही विकसित केली आहेत. अलीकडेच १८०० किलोग्रॅम पेलोडचे भूसमन्वयक वाहन तयार केले आहे. या शोधांमुळे अंतराळ तंत्रज्ञानाची मदत हवामानशास्त्र, संदेश दळणवळण, प्रक्षेपण आणि रिमोट सेन्सिंग अशा राष्ट्रीय गरजांसाठी झाली आहे. हे सर्व कमीतकमी खर्चात साध्य झाले आहे. भारतीय अवकाश कार्यक्रमांसाठी चालू वर्षाच्या अर्थसंकल्पातील तरतूद ४५० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स इतकी आहे. या तुलनेत 'नासा'चा अर्थसंकल्प फक्त १५ अब्ज डॉलर्स इतका आहे.

भारतीय तंत्रज्ञानातील परिवर्तन स्थिर राहणारे नाही. ते सतत उत्क्रांतीशील राहिले आहे. गेल्या दशकात अनेक मोठे शोध लागले आहेत. त्यांपैकी काहींचा विचार करू. संशोधन केवळ संशोधनासाठी न ठेवता आपण त्याची सांगड तंत्रज्ञानाशी घातली आहे. त्याचवेळी सामाजिक आणि आर्थिक गरजांच्या दिशेने अधिक पावले टाकली आहेत. केवळ स्थानिक वा राष्ट्रीय उद्दिष्टे न ठेवता प्रामुख्याने वैश्विक दृष्टिकोन ठेवून संशोधन आणि विकास करण्यावर आपण भर दिला आहे. त्यामुळे काही महत्त्वाची स्थित्यंतरे झाली आहेत. उदाहरणार्थ, १९६० च्या दशकात औषधी उत्पादनक्षेत्रात आयात केलेल्या औषधी द्रव्यांचा पायाभूत उपयोग केला जात असे. याउलट जागतिक स्पर्धेत उतरण्याच्या ईर्षेने अलीकडेच संशोधन चालू आहे. अर्थात हे परिवर्तन संथ गतीने; परंतु निश्चितपणे विकासाच्या दिशेनेच झालेले आहे. जगभरातील १०० सर्वोत्कृष्ट कंपन्यांना भारतीय बुद्धिमत्तेचा प्रभाव जाणवल्याने त्यांनी त्यांची संशोधने व विकास केंद्रे भारतात सुरू केलेली आहेत.

तंत्रज्ञानातील परिवर्तनात भारताची प्रमुख बलस्थाने कोणती? भारतात जेवढे शैक्षणिक पात्रता असणारे अभियंते आहेत तेवढे अन्यत्र कोठे नाहीत. संशोधन व विकास क्षेत्रातील मनुष्यबळात भारत जागतिक स्पर्धेत सातव्या क्रमांकावर आहे. अनेक भारतीय वैज्ञानिक, तंत्रज्ञ आणि उद्योगपती भारताबाहेर कार्यरत असले तरी त्यांचा मातृभूमीशी अधिकाधिक संपर्क आहे. भारतात उच्च शिक्षणाच्या अनेक संस्था आहेत. त्यात संशोधन केंद्रे आणि प्रयोगशाळा यांचाही समावेश होतो. त्यातून वैज्ञानिक आणि तांत्रिक समस्यांवर विविध स्तरांवर लक्ष केंद्रित केले जाते. शासकीय, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रांत आपले

अनेक असामान्य नेते क्रांती आणि उत्क्रांतीवर्धक परिवर्तनात नि:स्पृहपणे योगदान देतात. देशातील व देशाबाहेरील अधिकाधिक व्यक्ती तंत्रज्ञान आणि उद्यमशीलतेत 'रोल मॉडेल'ची भूमिका पार पाडत आहेत. कोट्यवधी ग्राहक असलेली मोठी देशांतर्गत बाजारपेठ भारताकडे आहे. गेल्या दशकात भारताचा आर्थिक विकास दरवर्षी ६% ह्या वेगाने झालेला आहे. एवढा आर्थिक विकासाचा वेग असणाऱ्या देशांची संख्या जगात फार नाही. यावर्षी तर आपण ८% विकासदराचा उच्चांक गाठणार आहोत. येत्या दहा वर्षांत आपला विकास वेग १०% हून जास्त असू शकेल.

भारतीय तंत्रज्ञानातील परिवर्तनाला कोणती नवीन दिशा आवश्यक आहे? राष्ट्राच्या प्रमुख समस्या सोडविण्यासाठी आता नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग आवश्यक आहे, हे फक्त एकच समस्या घेऊन मला स्पष्ट करू द्या. आपल्यातील २०० दशलक्ष प्रौढांना लिहिता-वाचता येत नाही. आपली निरक्षरता दरसाल केवळ १.५% दराने कमी होत आहे. आपल्याकडे प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता आहे. नेहमीच्या शिकण्याच्या पद्धतीत अक्षराकडून शब्दांकडे जाताना २०० तास शिकविणे आवश्यक असते. अशा नेहमीच्या पद्धती वापरल्यास ९५% साक्षरतेसाठी २० वर्षांचा प्रदीर्घ कालावधी लागेल. म्हणून ही समस्या सोडविण्यासाठी नवीन मार्ग शोधणे क्रमप्राप्त आहे.

भारतीय माहिती-तंत्रज्ञानातील महर्षी एफ.सी. कोहली ह्यांनी काय केले आहे, ते बघा. त्यांनी संगणकाधिष्ठित व्यावहारिक साक्षरता पद्धत विकसित केली आहे. तिच्यात वाचता येण्यावर भर दिला आहे. ही पद्धत आकलन, भाषा आणि संपर्काच्या सिद्धान्तावर आधारलेली आहे. तिच्यात संगणकाच्या उपयोगाने पडद्यावरील चिन्हे, प्रतिमा आणि अक्षरे ह्यांची दृक्-श्राव्य अनुभूतीतून ओळख करून दिली जाते. अक्षरांपेक्षा शब्द शिकण्यावर अधिक भर दिला जातो. वाचनावर लक्ष केंद्रित करून लोकांना स्वतंत्रपणे लिहिण्या-शिकण्यास प्रवृत्त केले जाते.

कोहली आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी माहिती-तंत्रज्ञान व संगणकाचा उपयोग करून वाचन शिकविण्याच्या नवनवीन पद्धती शोधल्या आहेत. हा प्रयोग प्रथम हैदराबादजवळील मेडक ह्या गावात केला गेला. प्रशिक्षित शिक्षकाशिवाय ८ ते १० आठवड्यांत स्त्रिया तेलुगू वर्तमानपत्र वाचू लागल्या. त्यानंतर कोहलींच्या चमूने अनेक केंद्रांवर भरपूर प्रयोग केले. अशा प्रयोगांत सहभागी होऊन २०,००० पेक्षा जास्त प्रौढ साक्षर झाले आहेत !

आपण एक साधा प्रश्न विचारू शकतो. हे सर्व संगणकाद्वारे केले तर ते भारतासारख्या गरीब देशाला परवडेल का? ह्या प्रश्नालाही कोहलींकडे नवीन उत्तर आहे. जगात सुमारे २०० दशलक्ष पीसीज् कालबाह्य झालेल्या आहेत. त्या काढून टाकल्या जातात. अशा पीसीज्चा उपयोग करून एका व्यक्तीला साक्षर करण्याचा खर्च शंभर रुपयांपेक्षा कमी येईल. कोहली म्हणतात, 'संगणकाधिष्ठित व्यावहारिक साक्षरता पद्धती'चा वापर करून २० वर्षांऐवजी ३ ते ५ वर्षांच्या आतच ९० ते ९५% पर्यंत साक्षरता मी वाढवू शकतो. अशा नवीन दृष्टिकोन आणि पद्धतींनी प्रश्न सोडवूनच भारतात परिवर्तन होऊ शकते.

आगामी काळात बदल घडवून आणणाऱ्या भारताने सामान्य लोकांबद्दल सहृदयता बाळगली पाहिजे. गरिबांच्या समस्यांकडे सातत्याने लक्ष दिले पाहिजे. या ठिकाणी मी अशाच एका समस्येवर लक्ष केंद्रित करतो. लक्षावधी स्त्रिया रोज विहिरीतून पाणी ओढतात. बराच वेळ पाणी ओढल्यावर त्या दमतात व मोठा श्वास घेतात. पण हा दम घेताना त्यांना दोरीवरील पकड ढिली करून चालत नाही; कारण पकड ढिली झाली तर पाण्यासकट बादली विहिरीत पडेल व त्यांचे सर्व श्रम वाया जातील. अर्थात, लोकांनी विहिरीत पडलेली बादली बाहेर काढण्याचे अनेक मार्ग शोधून काढले आहेत. उदाहरणार्थ, दुसऱ्या दोरीला गळ लावून विहिरीत पडलेली बादली बाहेर काढणे; परंतु त्यामुळे

विहिरीत बादली पडणे थांबले नव्हते. जोपर्यंत तंत्रकुशल कामगार अस्तित्वात आला नव्हता तोपर्यंत अशीच स्थिती होती; पण ज्यावेळी ही समस्या तंत्रकुशल कामगारासमोर आली त्यावेळी एका चाकाला एक लिवर लावून ही समस्या त्याने सोडविली. दोरी ओढताना ती लिवर त्या चाकात अडकत नसे, पण जेव्हा दोरीवरची पकड ढिली होत असे व पाण्याने भरलेली बादली खाली जात असे, तेव्हा ती लिवर त्या चाकात अडकत असे व चाक फिरत नसे; व त्यामुळे पाण्याने भरलेली बादली जिथल्या तिथेच राहत असे. आता एखादी म्हातारी बाई विहिरीतून पाणी ओढताना दमली तर मध्येच थांबू शकते, श्वास घेऊ शकते, शेजारणीशी बोलू शकते व नंतर परत आपल्या कामाला सुरुवात करू शकते. गुजरातमधील खेडेगावात अशा हजारो लिवर लावल्या आहेत व अशाच लिवर सर्व देशभर वापरल्या जातील. रोज विहिरीतून पाणी खेचणाऱ्या लक्षावधी स्त्रियांना ह्यातून केवढा मोठा दिलासा मिळेल, याची कल्पना तुम्हाला करता येईल.

आपणच आपल्याला प्रश्न विचारला पाहिजे की, गेल्या २०० वर्षांत विहिरीतून पाणी काढण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कप्पीमध्ये का बदल झाला नाही? खरंच अगदी सर्वसामान्य असा हा प्रश्न आहे. लक्षावधी माणसांना रोज भेडसावणाऱ्या या समस्या अस्तित्वात असलेल्या शास्त्राचा उपयोग करून का सोडविल्या जात नाहीत? कप्पीच्या उदाहरणासंदर्भात आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, पूर्वी बोटीमध्ये वल्ही ठेवण्यासाठी खलाशी कप्पीचा वापर करीत असत. बांधकामाच्या क्षेत्रातही पूर्वी कप्पीच्या संचाचा (साखळीचा) उपयोग करीत असत. यावरून असे सिद्ध होते की, कप्पीची संकल्पना ही नवीन नाही; पण ह्या संकल्पनेचा नेहमीच्या जीवनातील समस्या सोडविण्यासाठी उपयोग केला जात नव्हता. आता मात्र गरिबांच्या समस्या सोडविण्यासाठी अशा संकल्पनांचा सहृदयतेने उपयोग केला जायला हवा. स्थानिक लोकांच्या क्षमतेला एक मूल्य प्राप्त करून देण्यासाठी आपण शास्त्रज्ञांच्या बुद्धीचा वापर करून घेतला पाहिजे.

हे सर्व घडण्यासाठी आपण एक नवीन मूल्यपद्धत निर्माण करायला हवी की, ज्यामुळे गरिबांसाठी व तळागाळांतील लोकांच्या समस्या सोडविणे हे एक राष्ट्रीय कर्तव्य ठरेल. ह्या राष्ट्रीय कर्तव्यात जे भर टाकतील त्यांना राष्ट्रीय हीरो (नेता) म्हणण्यात येईल. त्यामुळेच अशिक्षित असलेला तंत्रकुशल कामगार, ज्याने ही कप्पी पद्धत विकसित केली, त्याला मान्यता देण्यात आली व मागील वर्षी त्याला बक्षीस देण्यात आले. गरिबांच्या समस्या सोडवतील असे बदल, अशा संकल्पना, अशा पद्धतींची आपल्याला गरज आहे.

आपण आपली मानसिकता व मूल्यपद्धती कशी बदलू शकू? स्थानिक तंत्रकुशल कामगारांनी, कुंभारांनी, शेतकऱ्यांनी, विणकरांनी व यांच्यासारख्या इतरांनी विकसित केलेल्या तंत्रांना पारंपरिक तंत्रे असे म्हटले जाते. ही तंत्रे आपल्या आधुनिक तंत्रामध्ये समाविष्ट केली जात नाहीत. आता हा बदल आपण कसा काय घडवून आणू शकू की जेणेकरून पारंपरिक तंत्राचा आधुनिक तंत्रामध्ये समावेश होऊ शकेल? जानेवारी २००० मध्ये पुणे येथे घेतलेल्या 'इंडियन सायन्स काँग्रेस'मध्ये मी एक प्रयोग केला. या सायन्स काँग्रेसचा अध्यक्ष या नात्याने सांगितले की, ही सायन्स काँग्रेस 'नॉलेज काँग्रेस' होऊ द्या. ही लोकांची काँग्रेस बनावी. आम्ही हे दाखवून देऊ की, आम्ही सर्वसामान्यांच्या हाताला किंमत देतो. आमच्या शास्त्रीय प्रदर्शनामध्ये तळागाळांतील अनेक सर्जनशील, तंत्रकुशल लोकांनी भाग घेतला. त्यांनी लोकांना प्रात्यक्षिके दाखविली. त्यांच्यापैकी कोणालाही इंग्रजी येत नव्हते. त्यात २००० शास्त्रज्ञांसमोर ते त्यांच्या लोकभाषेतून आपल्या तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके दाखवीत. या बाबतीत ते अशिक्षित, तंत्रकुशल लोक व नोबेल (लोरेट) पारितोषिक विजेते शास्त्र एकाच पातळीवर होते आणि या ठिकाणी मला हे आवर्जून

सांगावेसे वाटते की, नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांपेक्षा त्या अशिक्षित तंत्रकुशल लोकांना जास्त टाळ्या मिळाल्या. मला वाटते की, शास्त्रज्ञांना पहिल्यांदाच हे जाणवले असेल की, बदलाची शक्ती किती प्रचंड आहे. त्यांना हेही कळले असेल, की त्या अशिक्षित तंत्रकुशल लोकांना आधुनिक शिक्षणपद्धतीचा गंधही नव्हता. आता या जाणिवेचे रूपांतर त्या अशिक्षित तंत्रकुशल कामगारांबद्दल वाटणाऱ्या आदरात व अर्थपूर्ण भागीदारीत व्हावे.

नॅशनल इनोव्हेशन फाऊंडेशन (NIF) अशा तऱ्हेचा परस्परांबद्दलचा आदरभाव व भागीदारी तयार करण्यास मदत करते. ही संस्था तळागाळातील तंत्रकुशल कामगारांच्या या संशोधनाला मान्यता देते. मग ते संशोधक शेतकरी असोत किंवा झोपडपट्टीतील राहणारे असोत किंवा अशिक्षित तंत्रकुशल कामगार वा शाळा सोडलेले असोत. NIFने दोन वर्षांपूर्वी एक स्पर्धा घेतली होती. पहिल्या वर्षी एक हजारापेक्षा कमी लोकांनी भाग घेतला. दुसऱ्या वर्षी १६,००० पर्यंत ही संख्या गेली. आपले राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी विजेत्यांना पारितोषिके वाटली. त्या विजेत्यांपैकी बरेचजण अशिक्षित वा अर्धशिक्षित होते. मागील वर्षाच्या विजेत्यांमध्ये ८वीला शाळा सोडलेलेही होते, त्यांनी एक संकीर्ण यंत्रमानव बनविला होता. त्या विजेत्यांमध्ये एक शेतकरीही होता. त्याने वेलदोड्याचा एक प्रकार विकसित केला. आज केरळमध्ये ८०% मार्केट या वेलदोड्याने काबीज केले आहे. त्या विजेत्यांमध्ये अशी एक अशिक्षित व्यक्ती होती की, जिने रोगांना प्रतिकार करणारा एक 'पिजन-पी'चा प्रकार विकसित केला. शिक्षणापासून वंचित असलेल्या या लोकांनी आपल्याला असे दाखवून दिले आहे की, जीवनाच्या प्रयोगशाळेत आपली निरीक्षणशक्ती वापरून, विश्लेषण व संश्लेषण करून आपण काय नवनिर्माण करू शकतो ! आता या लोकांचे अभिनंदन करण्याची वेळ आली आहे. त्यांच्या सर्जनशीलतेला आमचा सलाम !

जागतिक स्तरावरील 'जनरल इलेक्ट्रिक' आणि 'मोटोरोला' सारख्या कंपन्या आणि मुंबईतील दीड लाख नागरिकांना जेवणाचे डबे रोज पोहोचविणारे व्यवस्थापन यात काय साम्य आहे? 'फॉर्बस् ग्लोबल' या अमेरिकन साप्ताहिकाने केलेल्या पाहणीनुसार डबेवाल्यांच्या कामात चुकीची संभाव्यता एक दशलक्षात एक इतक्या अल्पप्रमाणात असते. पण आपण त्यांच्याकडे कधीच लक्ष दिले नाही. मोठ्या प्रमाणात निरक्षर असणाऱ्या या डबेवाल्यांची नित्यनूतन कार्यपद्धती बघण्यासारखी आहे. याचे गुपित अनेक वर्षांच्या अनुभवांतून निर्माण झालेल्या संज्ञापद्धतीत आहे. प्रत्येक डब्यावर न पुसले जाणारे चिन्ह असते. अशा चिन्हांचे दहा प्रकार असतात. प्रत्येक चिन्हात अक्षर आणि अंकांचे मिश्रण असते. खर्च आणि विश्वसनीयता यांचा विचार केला तर एखाद्या फेडरल एक्स्प्रेस पद्धतीच्या तुलनेने डबेवाले नेहमीच पुढे असतात. काही व्यवस्थापन संस्थांमध्ये उद्योग नमुन्यांचा पद्धतशीर अभ्यास केला जातो. या उदाहरणावरून हे स्पष्ट होईल की, निरक्षर किंवा अर्धसाक्षर लोकांमधील नूतन पद्धत क्षमता एकदम शून्यावर येऊन पोहोचत नाही. यशस्वी होण्यासाठी व टिकून राहण्यासाठी त्यांना नित्यनूतन पद्धतीने काम करावेच लागते.

भारत नित्यनूतन व क्रियाशील करायचा असेल तर आपल्या युवाशक्तीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. कारण तिच्यावर राष्ट्राची शक्ती आणि चैतन्य अवलंबून आहे. नीट वळण लावल्यास युवक-युवती संस्कृतीचे कैवारी होऊ शकतात. राष्ट्राभिमान आणि स्वातंत्र्याचे रक्षक होऊ शकतात. परंतु असे वळण लावण्यासाठी बालपणापासून योग्य प्रकारचे शिक्षण आवश्यक आहे. नित्यनूतन पद्धतीच्या कार्यकर्त्यांची वृत्ती आपल्या तरुणांमध्ये भिनली पाहिजे. अशा कार्यकर्त्यांच्या शब्दकोशात अशक्य हा शब्दच नसतो. सर्वांना जे दिसते तेच तेही पाहत असतात; पण त्यांच्यासारखा विचार दुसरे करू शकत नाहीत. नित्यनूतन पद्धतीतील कार्यकर्त्यांना तोचतोचपणा नको असतो.

त्यांच्या प्रेरणा प्रश्न सोडवतात आणि कल्पनांतून वस्तू निर्माण होतात. असे कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी जीवन आणि कार्याविषयीचा दृष्टिकोन बदलायला हवा. वाहवत जाणाऱ्या संस्कृतीचे रूपांतर गतिशील संस्कृतीत झाले पाहिजे. व्यर्थ बडबडीची संस्कृती विचारशील आणि कार्यप्रवण संस्कृतीत परिवर्तित झाली पाहिजे. अवसानघातकीपणाऐवजी आत्मविश्वास आणि निराशेच्याऐवजी आशा पल्लवीत झाली पाहिजे. आज राष्ट्राला अशा नित्यनूतन कार्यपद्धतीच्या चळवळीची गरज आहे.

युवावर्गाला सृजनशील विचार करण्याची सवय कशी लावता येईल? थॉमस अल्वा एडिसनसारख्या दंतकथासमान जीवनकार्य असणाऱ्या संशोधकापासून उमलत्या युवावर्गाला बरेच काही शिकण्यासारखे आहे. एडिसनचा १०९३ पेटंटसूचा उच्चांक होता, हे सर्वश्रुत आहे. यात विद्युतदिवा, टाइपरायटर, विद्युत पेनयुक्त फोनोग्राम आणि चलत्‌चित्र कॅमेरा यासारख्या अनेक शोधांचा समावेश होता. त्याच्या कार्यपद्धतीवरून असे दिसते की, पूर्वग्रहरहित दृष्टीने शिकणे आणि चिकाटी या चाव्यांनीच सर्जनशीलतेचे कुलूप उघडता येते. एडिसनने त्याच्या सर्जनशीलतेचा उपयोग केवळ नवीन शोध लावण्यासाठी न करता त्या शोधांना बाजारपेठ मिळवून स्पर्धकांना आर्थिक आघाडीवरही पराभूत करण्यासाठी केला.

१९३१ मध्ये एडिसनच्या मृत्यूनंतर ३५०० वह्या मिळाल्या. त्या एखाद्या प्रचंड बौद्धिक वादळासारख्याच वाटतात. त्यावरून साठ वर्षांच्या कार्यकाळात एडिसनचे मन कसे कार्यरत होते, ते आपल्याला कळू शकते. एडिसनचे औपचारिक शिक्षण झालेले नसले तरी नवीन शोध लावण्यात त्याची बरोबरी कोणीच करू शकणार नाही. या वस्तुस्थितीच्या ठळक खुणा या वह्यांत सहज दिसतात. या वह्या त्याच्या बौद्धिक प्रगतीचा इतिहासच सादर करतात.

विचारांची उत्पत्ती कशी होते? कुतूहल ही विचारांची जननी असते. कुतूहलातून प्रश्न निर्माण होतात आणि कल्पनाशक्तीला चालना मिळते. आइन्स्टाईनने म्हटल्याप्रमाणे, 'विस्मय आणि जिज्ञासारहित व्यक्ती असून नसल्यासारखी म्हणजे विझलेल्या मेणबत्तीप्रमाणेच असते.' एडिसनच्या जिज्ञासेतूनच नवनवीन कल्पनांचा जन्म झाला.

औपचारिक शिक्षणाचा अभाव हे एडिसनला मोठे वरदान वाटले. त्यामुळे अधिक शिक्षित स्पर्धकांच्या तुलनेन एडिसन कमीतकमी गृहीतकांवर शोध लावू शकला. हे स्पर्धक साधेसुधे नव्हते, तर मोठमोठे वैज्ञानिक आणि अभियंते होते. कोणत्याही विचाराने किंवा अनुभूतीने त्याच्यात उत्साह संचारत असे आणि त्यामुळे साध्यासाध्या वस्तूंच्या उपयोगातून नवीन शोध लावण्याची त्याची प्रवृत्ती होती.

एखादा प्रयोग फसला म्हणजे त्यातून काय शिकण्यासारखे आहे, याचा एडिसन उत्साहाने विचार करून आपल्या नवीन अनुभवांची आणि शोधांची यशापयशासह टिपणे करून ठेवत असे. एका प्रयोगात फसलेल्या विचाराचा उपयोग दुसऱ्या प्रयोगात तो मोठ्या कौशल्याने करीत असे. एखादी कल्पना साकार झाल्याबरोबर तिचा उपयोग पूर्वीच्या अपयशाचे रूपांतर यशात करण्यासाठी तो खुबीने करीत असे. अन्य क्षेत्रांतील व्यक्तींना सुचलेले विचार लिहून ठेवण्याची त्याची सवय होती.

एडिसनच्या जीवनापासून शिकण्यासारखे धडे फार साधे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे गृहीतकांना सतत आव्हान द्या. कोणतेही पूर्वग्रह ठेवू नका. मनाच्या खिडक्या नेहमीच उघड्या ठेवल्या पाहिजेत. दुसरी गोष्ट म्हणजे, धीर व चिकाटीचा नेहमीच उपयोग होतो. तिसरी गोष्ट अशी की, कोणतीही गोष्ट अंतिम नसते. सर्वोत्कृष्ट वस्तूंपेक्षाही अधिक चांगल्या वस्तू निर्माण करण्यासाठी झटले पाहिजे. आपणच निर्माण केलेल्या वस्तूंची जागा नवीन व अधिक उपयुक्त वस्तूंना द्या. शेवटची गोष्ट म्हणजे, तुम्ही तुमच्या यशापेक्षा

(पान क्र. २२ वर)

# भगवान श्रीकृष्ण

*भगवान श्रीकृष्णाचे वास्तव चरित्र काय होते, याचा अभ्यासपूर्ण विचार मांडणाऱ्या लेखमालेतील हा दुसरा लेख*
*- संपादक*

(लेखांक दुसरा)

## श्रीकृष्ण चरित्रविषयक तीन ग्रंथ -

श्रीकृष्णाच्या राजकीय, धार्मिक व सामाजिक, आध्यात्मिक क्षेत्रातील जीवनावर महाभारत प्रकाश टाकते, चरित्राचा विस्तार हरिवंशात आढळतो, देवताविषयक सर्व शंकांचे निरसन श्रीमत् भागवताने केलेले आहे. सारे उपासना पंथ, संप्रदाय भागवतातून निघालेले आहेत. या तीन ग्रंथांच्या साहाय्याने श्रीकृष्ण जीवन अभ्यासले गेले पाहिजे.

## आपण कल्पना जाळात अडकलो आहोत.

आज आपल्या राष्ट्रात एका बाजूला भौतिक जडवाद व दुसऱ्या बाजूला निधर्मी राज्यकल्पना यांनी बद्ध झालो आहोत. याचा परिणाम धर्म व नीती या गोष्टींवर झाल्याने सहस्रावधी वर्षे या राष्ट्रात मांगल्य उत्पन्न करणाऱ्या जीवननिष्ठा लोप पावत आहेत. आपल्या मूलभूत प्रेरणेपासून आपण दूर चाललो आहोत. आतापावेतो जोपासलेल्या जीवनमूल्यांना धक्का मिळालेला आहे. नीतिमंदिर उद्ध्वस्त होत आहे. वेगवेगळ्या वादांचे एकांगी अभिमान बळावू लागला आहे. निधर्मीपणाच्या निष्ठाशून्य उद्घोषामुळे विधायक स्वरूपाच्या जीवनाची कोणतीही दृष्टी भारतातील राजसत्ता उत्पन्न करू शकली नाही. पूर्वीची राजसत्ता परकी म्हणून जीवननिष्ठा उत्पन्न करू शकली नाही व आजची राजसत्ता निधर्मी म्हणून जीवननिष्ठा निर्माण करावयाच्या संबंधी उदासीन आहे. अशा परिस्थितीत ही रिकामी धर्मशाळा झालेली असल्याने कोणताही वाटसरू ठाण मांडू शकतो. युरोप खंडात उत्पन्न झालेल्या विविध वादप्रणाली येथे आपला प्रभाव पाडत आहेत. भौतिकतेच्या विशिष्ट जीवनाकडे येथील जनता भरकटली जात आहे.

## जीवन याहून व्यापक आहे

जीवनाला भौतिकतेशिवाय अनेक पैलू आहेत. त्यांचाही विचार करण्याची तितकीच आवश्यकता आहे. हे ध्यानात घेतले असता जीवनाकडे पाहण्याची यथार्थ जाणीव व दृष्टी श्रीकृष्णाचे विशाल जीवन व त्या जीवनातून उत्पन्न झालेले तत्त्वज्ञान देऊ शकते. संघर्षाच्या वणव्यात सापडलेल्या व विनाशाच्या काठावर आलेल्या मानवतेला पुन: मूळपदावर येण्यासाठी या दृष्टीची आवश्यकता आहे. या राष्ट्राला आपली मूल्ये ओळखण्याच्या भूमिकेतून ही दृष्टी आवश्यक ठरते. भगवान श्रीकृष्णाचे जीवन हे या भूमिकेशी सुसंगत आहे. सर्व जगाचा उद्धारक, द्रष्टा, धर्मसंस्थापक, यशस्वी राजपुरुष, अधर्माचा निस्वादक व शाश्वत मूल्यांचा मार्गदर्शक हे महाभारतातील श्रीकृष्णाचे स्वरूप आहे. भगवान श्रीकृष्ण हे युगपुरुष होते. भारताचा इतिहास हा सांस्कृतिक इतिहास आहे. भारतीय जीवनाच्या परमोच्चतेचे, अध:पतनाचे व पुन: परिस्थितीवर मात करून घडून आलेल्या पुनरुत्थानाचे या इतिहासात महर्षी व्यासांनी दर्शन घडविले असून, त्यापासून आज राष्ट्राला आत्मज्ञान प्राप्त व्हावे, हा व्यास महर्षींचा हेतू आहे.

## दुहेरी आपत्ती

आज आपण दुहेरी संकटात सापडलेलो आहोत. बाह्य सांस्कृतिक आक्रमण व अंतर्गत संस्कृतीचे विस्मरण. बाह्य आक्रमण नष्ट करावयास सर्व मानवी कोमल भावावर विजय मिळवून अंत:करण एकवटून व सर्वांच्या आत्यंतिक कल्याणाच्या जीवनाशी एकरूप व्हावे लागेल आणि तेथे सांस्कृतिक जीवनाची पुनर्स्थापना करावी लागेल. श्रीकृष्णांनी हे काम कसे पूर्णावस्थेला नेले व त्यांनी धर्माची

प्रतिष्ठापना केली म्हणजे काय केले हे पाहावे लागेल. म्हणजे या सांस्कृतिक इतिहासाचे निरीक्षण पूर्ण होईल.

### एक अडचण

दुर्दैव आपले की, या देशाचा इतिहास सर्वप्रथम पाश्चात्यांकडून लिहिला गेला. या देशाचा आत्माभिमान नष्ट करण्याचा हेतू अंत:करणात धरून त्यांनी हे लिखाण केले आहे. भारतीयांचा धर्म व संस्कृतीवरील अभिमान नष्ट करण्याच्या बाबतीत आपण यशस्वी झाल्याबद्दल समाधान व्यक्त करणारे पत्र श्री. मॅक्समुल्लर यांनी स्टेट सेक्रेटरीला धाडले आहे. अशा संशोधनावरील लिखाणावर आधारलेल्या शिक्षण तंत्राच्या संस्कारांनी जी पिढी उत्पन्न झाली, ती आत्मविस्मृत झाल्याबद्दल त्यांनी आनंदाचे उद्‌गारही काढले आहेत. अशा रीतीने खऱ्या अर्थाने आत्मविस्मृती घडून आली. तिचे परिणाम आजही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रकर्षाने जाणवत आहेत.

### यावर तितकाच कठोर उपाय आवश्यक

हा आग्रही सांप्रदायिक दृष्टिकोन बाजूला सारून मूळ संहितेकडे वळले पाहिजे. त्याच्याकडे शुद्ध बुद्धीने पाहिले पाहिजे. हे पक्के ध्यानात ठेवले पाहिजे की, जगात धर्माचे पुनरुज्जीवन हेच दैवी सामर्थ्याचे मानवी आविष्कारात प्रकटीकरण होय. मानवातून देवत्व उत्पन्न होते. मानवी जीवनाचे देवजीवनात रूपांतर होणे, यालाच आपण अवतार म्हणतो. हाच श्रीकृष्णाच्या जीवनाचा हेतू होता. धर्माचे पुनरुत्थान व त्याप्रमाणे मानवी जीवन शुद्ध, संपन्न, सुदृढ व वैभवपूर्ण करणे हेच त्याचे जीवितकार्य होते.

### श्रीकृष्णाचा जन्म

श्रीकृष्णाच्या जन्माविषयी भागवतातील कथा विख्यात आहे. श्रीकृष्ण जन्मला. वासुदेव कैदखान्यातून बाहेर पडला. रात्रीची वेळ होती. सारखा पाऊस कोसळत होता. तो यमुनेवर आला. ती दुथडी भरून वाहात होती. तो तसाच चालला. श्रीकृष्ण बाळाच्या पदस्पर्शाने यमुना ओसरली. वसुदेव यमुना सहज ओलांडून गेला. तो गोकुळात गेला. तिथे मुलांची अदलाबदल केली आणि परत स्वस्थानी आला. हे सारे कसे बिनबोभाट घडले.

'हरिवंश' ऐतिहासिक ग्रंथ मानला जातो. त्यामुळे भागवतात व हरिवंशात या कथेत फरक आढळतो. अधिकारी वर्ग कंसाच्या क्रूरतेला त्रासलेले होते. श्रीकृष्णाचा जन्म झाला त्यावेळी त्यांनी वसुदेवाला बाहेर जाऊ दिले. नंतर त्या दिवशी कर भरण्यासाठी मथुरेत आला होता. वसुदेवाने बालक नंदाच्या स्वाधीन केले व त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकली. त्याला मथुरा सोडून जाण्यास वसुदेवाने सांगितले. तो जलमार्गाने यमुना ओलांडून व्रजात गेला. नंदाच्या घरी अशाप्रकारे लहानाचा मोठा झाला.

### श्रीकृष्णाचे बालपण

श्रीमत् भागवतात व्रजातील बाळकृष्ण जीवनाचे अतिशय मनोरम वर्णन आलेले आहे. श्रीकृष्ण वसुदेवासारखाच दिसावयास सुंदर होता. श्रीकृष्णाचे वर्णन - साक्षात् मन्मय मन्मथ: । असे आहे. श्याम याचा अर्थ 'तत्पत कांचन वर्णाभ: ।' असा आहे. गोकुळातल्या जनमानसावर या आकर्षक बालकाची छाप पडलेली होती. तो विलक्षण लोकप्रिय झाला. त्याच्या दर्शनाबरोबर गोकुळातील आबालवृद्ध किती आतुरतेने, उत्कटतेने त्याच्याकडे धाव घेत असत, याचे सुंदर वर्णन भागवतात आहे. गोकुळ व वृंदावनातील जीवनाच्या काळात इतक्या लहानपणी त्यांनी विलक्षण आकर्षणाने लोकांच्या हृदयात स्वत:ला स्थान मिळविले होते.

### गैरसमजुती

श्रीकृष्णाच्या बाळलीलेच्या वर्णनातून काही वेळा अपसमज निर्माण झालेले आढळतात. तो तरुणपणी व्रज सोडून गेला. पुन: परतला नाही. लहानपणीच्या काही घटनेवरून झालेले अपसमज दूर करण्याने अथवा त्याचा

अर्थ समजावून घेण्याने या गैरसमजुती नाहीशा होतील व त्याच्या सरळ जीवनाचा अर्थ ध्यानात येईल, म्हणून काही घटनांचा उल्लेख आवर्जून करण्यात आला आहे.

## राधा कोण?

या नावाच्या गोपीचा उल्लेख हरिवंशात, महाभारतात व भागवतातदेखील नाही. ब्रह्मवैवर्त पुराणात राधेचा उल्लेख आढळतो. राधा शब्दाची उत्पत्ती काही ठिकाणी अशी आढळते. रा - रास, धा-धावणे. रास क्रीडेकरता धावणारी. राधा गोपी एक रूपक. प्रेमभक्ती वाढविण्यासाठी हिचे चित्रण तयार करण्यात आले असावे. ब्रह्मवैवर्तात राधेला मूळ प्रकृतिक म्हटले आहे. प्रकृति व पुरुष अनादि आहेत. कार्यकरण कर्तृत्वे हेतु: प्रकृति: उच्यते ।

## गोपी वस्त्रहरण हेही रूपकच

गो म्हणे इंद्रिये. हिरवेगार गवत पाहताच गायी तिकडे धावतात. इंद्रियांचेही तसेच आहे. मनाच्या वृत्ती म्हणजे गोपी. ही वृत्तीरूपी गोपी भान विसरून सारासार विचार सोडून वाटेल तिथे धावते. गोपींना आवर घालण्यास गोपीवल्लभ इंद्रियांचा स्वामी आत्मा आहे. आत्म्याशी संबंध जडताच इंद्रिये पतनापासून वाचतात. त्यांच्यावर अंकुश ठेवण्याचे काम या गोपीवल्लभाचे आहे. म्हणून त्याला गोपींच्या वासनारूपी वस्त्राचे हरण करावे लागते. हा त्याचा गर्भितार्थ आहे. तो (श्रीकृष्ण) गोपीजनतारक होता.

त्यावेळी श्रीकृष्ण सात वर्षांचा बालक होता. सात वर्षांचा बालक काय हजारो तरुण स्त्रियांची कामवासना तृप्त करू शकतो? व्रजातून मथुरेला आल्यानंतर एकदाही कृष्ण परत व्रजात गेलेला नाही. गोपींशी क्रीडा या त्याच्या बालपणच्या गोष्टी आहेत. त्यात शृंगार न पाहता त्याच्या व्यक्तिमत्त्वाने आकर्षित झालेल्या तरुण गोपिकांची भक्ती पाहावी. त्यांना श्रीकृष्णाच्या बासरीची ओढ इतकी लागली होती की, बासरीचे स्वर ऐकताच हातातील काम टाकून कृष्ण असेल तिथे धावत जात व बेभान होत. भक्तीचा उद्रेक त्यांच्या ठिकाणी आढळतो. हे न समजता सर्वसामान्य रुढीप्रमाणे त्यांच्यात व्यभिचार ठरविले तर कृष्ण दोषी न ठरता असा विचार करणाराच व्यभिचारी वृत्तीचा असावा असेच म्हणावे लागते. गोपींचे प्रेम तर दिव्य व विशुद्ध होते. श्रीकृष्णाच्या व गोपींच्या प्रेमात वासनेचा अंशमात्र नव्हता. स्त्रिया लहान मुलाकडे निसर्गत:च आकर्षित होतात. त्यातून श्रीकृष्ण अत्यंत आकर्षक. त्याच्या व्यक्तिमत्त्वाने व्रजातील गोपी वेड्या झाल्या होत्या. इतकी रमणीयता श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वात होती. श्रीकृष्ण चारित्र्यवान होता. संस्कृतीच्या पुनरुत्थानासाठी त्याने जन्म घेतलेला होता. त्याच्या व्यवहारात कुठेच असभ्यता पाहावयास मिळत नाही.



## वेदातील रूपक

वेद वाङ्मयातदेखील पुष्कळशा गोष्टी रूपकात्मक आढळतात. वेदात असे म्हटले आहे की, कन्या उपवर झाली की तिचा प्रथम उपभोग चंद्र घेतो, नंतर गंधर्व, त्यानंतर अग्नी व शेवटी ती वराला उपभोगाला योग्य होते. या रूपकातील रहस्य समजून घेणे आवश्यक आहे. वैदिक वाङ्मय वाचताना खोलवर विचार करावा लागतो. तरच वेदातील विधानांचा अर्थ ध्यानात येतो. कन्या उपवर होणे याचा अर्थ तिच्यात कामवासना निर्माण होणे. मन म्हणजे चंद्र. 'चंद्रमा मनसो जात:।' विराट पुरुषाच्या मनापासून चंद्राची निर्मिती झाली. (ऋग्वेद) कन्येत कामवासना निर्माण होताच सर्वप्रथम ती तिच्या मनात निर्माण होते. म्हणजे मन व्यापून टाकते. तिला पुरुषाचा सहवास हवाहवासा वाटू लागतो. त्याच्याबद्दल चांगले बोलले गेल्यास ते ती टिपते. आता गंधर्व म्हणजे स्वराचा, मधुर वाणीचा वाचक शब्द आहे. स्वराची देवता गंधर्व मानली जाते. म्हणजे चंद्रानंतर गंधर्व तिला व्यापतो. म्हणजे पुरुषाच्या मधुर वाणीने तिची कामभावना उद्दीपित होते. हळूहळू ती प्रचंड रूप धारण

करते आणि अग्नीसारखी प्रदीप्त होते. म्हणजे गंधर्वानंतर अग्नी तिचा उपभोग घेतो. याचाच अर्थ कामाग्नी तिला सतावतो. नंतर ती वराला (पुरुषाला) भोगावयास योग्य बनते. अशा कामासक्त असलेल्या कन्येचा (वधूचा) वर उपभोग घेतो. या साऱ्या रूपकातून कन्येची कामपीडित अवस्था सांगितली गेली आहे. ही रूपके समजली नाहीत तर अर्थाचे अनर्थ ओढवतील.

**सोळा सहस्रनारी या संबंधीचे रहस्य**

हे एक श्रीकृष्णाचे मानवतावादी स्वरूप मानावे लागेल. प्राक्‌ज्योतिषपुरातील नरकासुराच्या बंदीतून मुक्त केलेल्या स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी त्या अभागिनींचे पाणिग्रहण कृष्णाने केले.

चतुर्दश सहस्त्राणि एकत्रिंशत् शतानिच । एक वेणीधरा: सर्वा: सती मार्गं अनुव्रता : । नरकासूर मानवतेचा शत्रू होता. तो स्त्रीजातीवर घाला घालीत असे. त्यांच्या इच्छेविरुद्ध बलात्कार करीत असे. त्याचे निस्वंदन कृष्णाने केले व बंदिस्त स्त्रियांना मुक्त केले. त्याप्रीत्यर्थ आजही नरक चतुर्दशी साजरी केली जाते. हा स्त्रीचा गौरवदिन आहे आणि त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा श्रीकृष्ण पराकोटीचा कल्याणकारी मानव असेच म्हणावे लागेल.

**रासक्रीडा**

याला रासलीला असेही म्हणतात. हा एक चांदण्या रात्रीतील आनंदाने नटण्याचा प्रकार आहे. यात नृत्यनाट्य आहे. रसानां समूह: - नवरसाचा समुदाय 'रस: उत्पद्यते यस्मात:' - ज्यापासून आनंद उत्पन्न होतो अशी रास शब्दाची व्याख्या केली जाते. 'रासोत्सव संप्रवृत्ति गोपी मंडन मण्डित:।' गोपींच्या समुदायाने शोभून दिसणारा रात्रोत्सव चालू झाला (भागवत स्कंध १०) हा उल्लेख श्रीकृष्ण व गोपी यांच्या रासक्रीडेसंबंधी आहे. हा एक त्यांच्या जीवनातला अमृतमधुर प्रसंग आहे. भागवत स्कंध १० अध्याय २९ ते ३३ यामध्ये रासक्रीडेचे हृद्य वर्णन आहे याला काही लोक रास पंचादपायी असे म्हणतात. हे अध्याय अति महत्त्वाचे मानले गेले आहेत. यातील वर्णन मूळ संहितेवरून वाचल्यास परमानंद प्राप्त होतो.

**संक्षिप्त गोषवारा -**

शरद ऋतूतील पौर्णिमेची रात्र होती. आकाश निरभ्र होते. निर्मळ चंद्र प्रकाशत होता. स्वच्छ पांढरे शुभ्र चांदणे पडले होते. सर्वत्र जणू अमृताचा वर्षाव होत होता. अशावेळी बाळ श्रीकृष्णाला गोप-बालांबरोबर खेळण्याची इच्छा झाली. तो यमुनेच्या वाळवंटात गेला. तेथे उभे राहून बासरी वाजविण्यास सुरुवात केली.

अध्याय २९ - ***भगवान् अपि ता रात्री: शरदोत्फुल्लमल्लिका: ।***

***निशम्य शीतं तत् अनङ्‌गवर्धनं व्रजस्त्रिय: कृष्णगृहीत्तमानसा: ।***

***आजग्मु: अन्योन्यं अलक्षितोद्यमा: सयत्रकान्तो जावलोलकुण्डला : । ४***

बासरीचा मंजुळ ध्वनी कानावर पडताच गोपी कामधाम विसरून वेड्या झाल्या व धावत सुटल्या व कृष्णाभोवती गोळा झाल्या. या बासरीचे त्यांना इतके आकर्षण होते. घरच्या लोकांच्या विरोधाला न जुमानता त्या बेभानपणे कृष्णाच्या बासरीच्या ध्वनीनुसार धावत सुटल्या. श्रीकृष्णांनी त्यांना विचारले - गोपींनो, तुम्ही इतक्या रात्री कामधाम टाकून माझ्याकडे धावत का आलात! तुम्ही आपआपल्या घरी जा. त्याचे ते बोलणे ऐकून त्या उदासीन झाल्या. जागच्या हलेनात. त्यांची ती भक्ती पाहून श्रीकृष्ण प्रसन्न मनाने त्यांच्याशी खेळावयास तयार झाला. ते सर्वजण फेर धरून खेळू लागले. यामुळे गोपींच्या मनात आम्ही कोणीतरी आहोत असा गर्व झाला. आम्ही भाग्यवान, हा त्यांच्या मनीचा भाव ओळखून त्यांच्या नकळत श्रीकृष्ण



निघून गेला.

श्रीकृष्ण एकाएकी नाहीसा झालेला पाहून गोपी स्तीमित झाल्या. त्यांना करमेनासे झाले. आपल्यापैकी एका गोपीला श्रीकृष्ण बनवून फेर धरून खेळण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात त्यांना गोडी वाटेना. बऱ्याच वेळानंतर त्यांना वाळूत श्रीकृष्णाची पावले दिसली. त्या पावलांचा मागोवा घेत, त्या गेल्या. तिथे त्यांना एक गोपी बसलेली दिसली. ती म्हणाली, मी पण कृष्णाच्या शोधात आहे. तो नन्दलाला कुठे आहे, कळत नाही. गोपींना अतिशय दु:ख झाले. त्या कृष्णाचा धावा करू लागल्या. त्यांचे ते निर्मळ मन पाहून श्रीकृष्ण पुन: तिथे आला. त्याला पाहताच गोपी हरखून गेल्या. त्या सर्व गोपींना घेऊन तो यमुनेच्या वाळवंटात आला. तिथे आपल्या दैवीपणाने गोपींना मोहून टाकले. प्रत्येक गोपीच्या जवळ एक श्रीकृष्ण असलेला पाहून त्या अत्यंत आनंदाने फेर धरून नाचू लागल्या. मधल्या जागी श्रीकृष्ण बासरी वादन करीत उभा होता. हा आनंदोत्सव पहाटेपर्यंत चालला.

***विक्रीडितं व्रजवधूभि: इदंच विष्णो: । श्रद्धान्वितो अनुश्रुणुयात् अथवा वर्णयेत् च ।***

***भक्तिं परां भगवतिं प्रतिलभ्य कामं । हृद्रोगं अश्वपढितो एव चिरेण धीर: ।***

व्रजातील गोपींच्या बरोबर केलेल्या विष्णूच्या क्रीडेचे हे जो श्रवण करतो व वर्णन करतो, त्याला परमभक्तीचा आनंद प्राप्त होतो. हृदयातील कामना अश्वगतीने अल्पावधीत प्राप्त करून घेतो.

रासक्रीडा म्हणजे आत्म्याचे आणि परमात्म्याचे मीलन होय. ही परमानंदप्राप्ती होय. सर्वच गोपी आपल्या जवळच कृष्ण आहे, अशा भावनेने भारल्या गेल्या. कृष्ण सान्निध्याच्या भावनेने त्या गढून गेल्या. जेथे तेथे त्यांना कृष्णच दिसत होता. कृष्णाशिवाय इतर कोणतीच गोष्ट त्यांच्या मनाला स्पर्श करीत नव्हती. इतकेच काय, काळाचे भानही त्यांना राहिले नव्हते. अष्टसात्त्विक भावात सर्व गोपी मग्न झाल्या होत्या. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' ही अवस्था त्या अनुभवत होत्या. जीव आणि शिव यांचे संपूर्ण ऐक्य या रासक्रीडेत सर्व गोपी अनुभवत होत्या. जीव आणि शिव यांचे संपूर्ण ऐक्य म्हणजे एकत्वाची अनुभूती. ही क्रीडा या दृष्टीने अलौकिक आहे. इथे लौकिक प्रणयाला थाराच नव्हता. प्रत्येक जीवाला मी शिवाच्या सन्निध आहे अशा उच्च भावावस्थेत नेणारी ही क्रीडा होती. ही रासक्रीडा म्हणजे जीव आणि शिव या उभयतांनी लुटलेला आनंदभाव होय. धन्य त्या गोपी, ज्यांना हा श्रेष्ठतम अनुभव प्राप्त झाला.

या क्रीडेमधे कोठेही व्यभिचाराचा भाव नसताना अनेक कवींनी श्रृंगारात्मक वर्णन करून या क्रीडेला वेगळीच कलाटणी दिलेली आहे, असे नाइलाजाने म्हणावे लागते. हा शुद्ध अद्वैतभाव गोपी अनुभवत होत्या. त्यांच्या भावनांना या कवींनी धक्का दिला आहे. हे भानही यांना राहिले नाही. हा अमृतानंदाचा आस्वाद न घेता भोगानंद निर्माण करून मूळ कल्पनेला बगल देण्यात आली आहे.

श्रीकृष्ण - जीवनातील काही प्रमुख घटनांचा परामर्श घेतला गेला आहे व त्या संबंधी योग्य दृष्टिकोन काय आहे याचे विवरण करण्यात आले आहे. थोडक्यात राधा, गोपिकांचे वस्त्रहरण, सोळा सहस्र नारींशी विवाह, रासक्रीडा यातील रहस्ये समजावीत, असा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे. याचा विचार झाल्यास श्रीकृष्णाचे जीवन किती निर्मळ होते हे ध्यानात येईल. आजही त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण तसूभरही कमी झालेले नाही. ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे.

(क्रमश:)

**शं. बा. मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

●●●

# प.पू.पांडुरंगशास्त्री आठवलेजी यांची प्रवचने
# ।।गीतामृतम् ।।

**गीतामृतम्**

**प.पू. पांडुरंगशास्त्री आठवले**

सद्विचारदर्शन प्रकाशन,

५ वी आवृत्ती १९९४ • पृष्ठे ८१६ किंमत - ६० रु.)

योगेश्वर श्रीकृष्णाच्या छायाचित्राने या पुस्तकाची सुरुवात झालेली आहे. नंतर 'भाव-बन्दन' या शीर्षकाखाली सद्विचार दर्शनने आपले विचार मांडले आहेत. भगवान योगेश्वराच्या मुखातून स्त्रवलेले हे गीतामृतम् व ते सहज प्रवाही करून आपल्यासमोर प्रवचनांच्या रूपात ठेवणारे प.पू. दादा (पांडुरंगशास्त्रीजी) या दोहोंच्या बाबतीत प्रस्तावना लिहून त्यांचा परिचय करण्याचे दु:साहस करणे ही निव्वळ बालिशता आहे. दोघेही अगाध व अथांग आहेत म्हणून त्यांच्याबद्दल प्रस्तावना न लिहिता त्यांना भाव-वंदन करणे हेच शोभादायक आहे, असे विचार सद्विचार दर्शनने प्रकट केले आहेत.

'गीता' तत्त्वज्ञानाचा वैश्विक अमूल्य ग्रंथ आहे. विश्वधर्मग्रंथ आहे. गीता भगवंतांनी स्वमुखाने गायली व वेदव्यासांनी मागावून ती महाभारतात गुंफलेली आहे. वेद, उपनिषदे यातील महान ज्ञानसागराला गीतेने स्वत:च्या लहानशा घागरीत सामावलेले आहे. सर्वशास्त्रमयी गीता. गीतेत सर्व शास्त्रांचा समन्वय आहे. गीताकारांनी मानवी जीवनाच्या चिरंतन अशा मूल्यांना विशिष्ट धर्माच्या किंवा संप्रदायाच्या नादात न पडता गीतेत गुंफले आहे. 'ह्यात माझे मौलिक असे काहीच नाही 'ऋषिभिर्बहुधा गीतं'... ऋषींनी जे अनेकवेळा अनेकप्रकारे गायिलेले आहे तेच मी सांगत आहे.' एवढा अमूल्य ग्रंथ मानवमात्राला देऊनही कृष्णाची नम्रता अद्‌भुत आहे.

मी वाङ्मय रसिक नाही, संस्कृत साहित्यज्ञ नाही, कर्मयोगी नाही, भक्त नाही किंवा वैय्याकरणी नाही. तरीही गीता मला आवडते. त्याचे कारण एकतर ती गाणाऱ्यावर माझे प्रेम आहे व दुसरे गीतेत मला खूप आश्वासने मिळतात व तीही भगवंताच्या 'स्वमुखाने' असे प.पू. शास्त्रीजी म्हणतात. त्यांच्यासारखे आश्चर्यकारक वक्ते व गीतेसारखा अमूल्य ग्रंथ ! किती सरस सुवर्ण-सौरभ योग हा ! प.पू. दादांच्या भाषेत भावनेचे माधुर्य, शैलीमध्ये हृदयाचे सौंदर्य, वाणीत वाङ्मयीन वैभवाची झलक, शब्दात शक्तीचा साक्षात्कार, विचारात वेदांचा परिचय व मनात मौलिकतेचा साक्षात्कार आहे. सरळता व स्पष्टता ही त्यांच्या वक्तृत्वाची वैशिष्ट्ये आहेत. हे त्यांच्या दीर्घकालीन तपश्चर्येचे फळ आहे. कवी कालिदासाने वर्णन केलेल्या वाणी व अर्थाचा - पार्वती व शिव युगुलासारखा - सुभग समन्वय त्यांच्या प्रवचनात दिसून येतो.

प.पू. शास्त्रीजींनी पहिल्यावेळी नैतिक व सांस्कृतिक दृष्टिकोन ठेवून गीतेच्या श्लोकांवर प्रवचने केली. दुसऱ्यावेळी जागतिक बुद्धिवादाची प्रमेये लक्षात घेऊन प्रवचने केली व तिसऱ्यावेळी वैदिक भक्तांचे विचार, जीव-शिवाच्या परमोच्च अवस्थेचा अनुभव त्यांच्या प्रवचनाद्वारे श्रोत्यांना ऐकायला मिळाला होता. प.पू. शास्त्रीजींच्या अशा तपाच्या परिणामामुळे श्रोतृवर्गातही केवळ श्रवणभक्ती न राहता कीर्तनभक्ती जागृत झाली आहे. 'कीर्तन' म्हणजे टाळ, मृदंग घेऊन नाचणे नव्हे; तर प्रभूच्या गीतेतील जे उन्नत दैवी व भावपूर्ण विचार आहेत, वैदिक संस्कृतीचे जे तेजस्वी, प्रेममय विचार आहेत त्या विचारांचे नि:स्वार्थ भावाने कथन करणे, त्या विचारांचे अमृत पाजणे म्हणजे

कीर्तन. कीर्तन-भक्तीच्या परिणामामुळे हजारोंच्या संख्येने जे बंधूभगिनी श्रोतृवर्गाच्या रूपात होते ते आज भारतीय संस्कृतीसाठी कार्यप्रवण झालेले आहेत.

प.पू.शास्त्रीजींची अनेक पुस्तके निघालेली आहेत. त्यातून ह्या निष्ठावान कार्यकर्त्यांना प्रेरणा व मार्गदर्शन मिळते. ह्या प्रवचनांच्या पुस्तकातील महत्त्वाचे पुस्तक 'गीतामृतम्'. हे गीतेवरील विद्वत्ताप्रचुर भाष्य नसून, सिंहावलोकनात्मक स्वैरविहार आहे. गीता वाचली हे तेव्हाच सांगता येईल जेव्हा आपले जीवनच गीतेवरील जिवंत भाष्य बनेल. गीतेचा पवित्र संदेश आपल्या जीवनात आणून आपणही खऱ्या अर्थाने धनुर्धर पार्थ बनण्याचा संकल्प केला पाहिजे. अर्जुन आपला आदर्श व कृष्ण आपला मार्गदर्शक, सहाय्यक व्हावा व आपल्या जीवनाला योग्य दिशा मिळावी, हीच गीतेची फलश्रुती आहे.

'गीतामृतम्' हे पुस्तक बाहेर कुठेही उपलब्ध होऊ शकणारे नाही. स्वाध्याय परिवारातील एका ओळखिच्यांनी मला पुस्तक वाचायला म्हणून दिले. (त्यांच्या स्वाध्याय केंद्रातून पुस्तक मिळू शकेल एखाद्यावेळी) आणि त्यामुळेच या पुस्तकाचा परिचय मी आपल्याला करून देत आहे. हे सर्व भगवंतामुळेच घडून आलं. पुस्तक मुदतीत परत द्यायचे असल्यामुळे ह्या पुस्तकाचा नंबर आधी लावला.

गोपाळकृष्णाच्या प्रेममुरलीने गोकुळात सर्वांना मुग्ध केले, तर योगेश्वर कृष्णाच्या ज्ञानमुरलीने -गीतेत कुरुक्षेत्रावर अर्जुनाला युद्धप्रवृत्त केले. जीवन हे रडण्यासाठी, पळून जाण्यासाठी नाही. हसण्यासाठी, खेळण्यासाठी आहे. संकटांशी हिमतीने झुंज देण्यासाठी आहे तसेच आशा व श्रद्धेच्या बळावर विकास साधण्यासाठी आहे. हेच गीता आपल्याला शिकवते. गीतेच्या ज्ञानाने मानवाला जीवनाभिमुख करण्याचा चिरंतन प्रयत्न केलेला आहे. अधमातल्या अधमापासून ते उत्तम पुरुषापर्यंत सर्वांना गीता मार्गदर्शन करते. कारण गीता ही उत्तम पुरुषापर्यंत सर्वांना गीता मार्गदर्शन करते. कारण गीता ही आई आहे. ती आपल्या कोणत्याही मुलाचा तिरस्कार करत नाही. त्याला चुचकारून सुधारायचाच प्रयत्न करते. पर्वत महंमदाकडे आला नाही तर महंमद पर्वताकडे जाईल; कारण पर्वतासारख्या जड निर्जीव पदार्थालासुद्धा मोक्षाचा मार्ग दाखवला पाहिजे. हा त्यामागचा हेतू. गीतेचे तसेच आहे. तुम्ही गीतेकडे नाही वळलात तर गीताच तुमच्याजवळ येईल, तुमचा हात धरील, अश्रू पुसेल, मार्ग दाखवील, हे विनोबाजींचे उद्‌गार आहेत.

पहिल्या अध्यायातील गीतेचे वैशिष्ट्य सांगताना शास्त्रीजी म्हणतात, पूर्णत्वाच्या शिखरापर्यंत घेऊन जाणारा हा महान ग्रंथ आहे. तत्त्वज्ञानातील उच्च विचार या ग्रंथात जितके पहावयास मिळतात तितके अन्यत्र कोठेही पहावयास मिळत नाहीत. वैश्विक कार्य करण्यासाठी ईशशक्तीने या ग्रंथाचे गान केले आहे.

गीतेचा महिमा अवर्णनीय आहे. किमान साठ-सत्तर भाषांत तिची भाषांतरे झालेली आहेत. तरीपण गीताप्रेमी समाज गीतेच्या प्रचाराबाबत उदासीनच राहिलेला आहे, अशी खंत शास्त्रीजी व्यक्त करतात. अनेक परदेशी लोकांनी गीतेतील विचारांची सनातनता पाहून आत्यंतिक प्रेमाने गीतेची भाषांतरे केलेली आहेत.

गीतेच्या पहिल्या अध्यायावरील प्रवचनापासूनच गीतेतील वाणीची प्रासादिकता अनुभवास येते. गीतेतील तत्त्वे चित्तहर व जीवनप्रेरक आहेत. शास्त्रीजी म्हणतात, ज्या परिस्थितीत गीता सांगितली, ती परिस्थिती पण स्फूर्तिदायक आहे. विव्हळतेमध्ये गीतेचा जन्म झालाय. शोकविव्हळ व शोकव्याकूळ झालेला अर्जुन आणि स्नेहव्याकुळ व स्नेहविव्हळ झालेले भगवान श्रीकृष्ण यांच्यातील हा संवाद आहे. विव्हळतेच्या भूमिकेवर हा संवाद झालेला आहे. या महत्त्वपूर्ण मुद्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो, असे शास्त्रीजी सांगतात. गीतेचा अर्थ

गायलेले तत्त्वज्ञान असा ते करतात. गाऊ शकतो म्हणून या ग्रंथाला गीता म्हणतात. षट्गुण ऐश्वर्यसंपन्न भगवान श्रीकृष्णांनी गायले म्हणूनच तिचे नाव श्रीमद्‌भगवत्‌गीता असे आहे, असे शास्त्रीजींचे म्हणणे आहे.

गीता म्हणजे काय आहे? याबद्दल फारच सुंदर दृष्टान्त शास्त्रीजी देतात. गीतेमध्ये स्वमतमंडन, परमतखंडन, पांडित्य प्रदर्शन यापैकी काहीही नाही, तर प्रेमातिरेकामुळे जगदंबेच्या स्तनातून स्वाभाविक वाहणारी ही दुग्धधारा आहे. दूध बालकाला चोखून मातेपासून घ्यावे लागते. इथे तोही प्रयास नाही. हे सहजप्राप्त स्तन्य म्हणजेच गीता आणि त्यामध्येच गीतेचे महत्त्व आहे, असे मला वाटते, असे शास्त्रीजी आपल्या प्रवचनात म्हणतात. त्याच्या पाठीमागे काही हेतू आहे का नाही याची मला शंका आहे, असेही ते सांगतात.

गीता कुरुक्षेत्रावर सांगितली, कुरू राजाने ती जमीन लागवडीखाली आणली. परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करून क्षत्रियांचा उद्दामपणा नाहीसा केला. म्हणून भारतीयांच्या दृष्टीने कुरुक्षेत्र हे धर्मक्षेत्र झाले आहे. आपले शरीर पण कुरुक्षेत्रच ! आपण झोपेतून उठलो की कुरू (सुरू) होतो ते रात्री झोपेपर्यंत. कुरू म्हणजे कर. या कर्मभूमीवर येऊन जो सिंहाप्रमाणे तेजस्वी गर्जना करणार नाही, गरुडाप्रमाणे आकाशात झेप घेणार नाही, त्याचे मानवी जीवन व्यर्थ ठरेल. हे शरीर कुरुक्षेत्राचे धर्मक्षेत्र होईल, आपण मनातील उद्दामता काढून टाकू तेव्हाच आणि मनातील उद्दामता काढून टाकणारी गीता आहे. <u>मी गीता वाचतो, पण मी उद्दामही आहे. मी गीता वाचतो, पण मी निस्तेज राहतो या दोन्ही गोष्टी एकत्र येऊच शकणार नाहीत. कारण गीता कार्यप्रवण करणारी, उन्मतता व अहंकार निपटून काढणारी आहे.</u>

'किंम् कुर्वत संजय' या धृतराष्ट्राच्या पहिल्याच प्रश्नाने गीतेची सुरुवात होते. कौरव, पांडव काय करीत आहेत? असा प्रश्न त्याने का विचारला? ते काही भोजन समारंभाला किंवा सोंगट्या खेळायला तिथे जमले नव्हते हे धृतराष्ट्राला माहीत नव्हते असे नाही. पण श्रीकृष्ण शिष्टाईच्या आधी धृतराष्ट्राने संजयाला शिष्टाईसाठी (मंत्रयुद्ध खेळण्यासाठी) पाठवले होते. (मंत्रयुद्ध - विपरित ज्ञान मनात भरवून देणे) त्याचा परिणाम पांडवांवर, विशेषत: अर्जुनावर झाला की नाही? ते युद्धाला सज्ज झाले आहेत की नाही? हे जाणून घेण्यासाठी धृतराष्ट्राने हा प्रश्न संजयाला विचारला आहे. अनेक चांगले मुद्दे मांडून, प्रश्न, शंका उपस्थित करून शास्त्रीजींनी स्वत:च त्याचे निराकरणही व्यवस्थित, मार्मिकपणे केले आहे. त्याचीच काही उदाहरणे मी वानगीदाखल इथे देत आहे.

हे आणखी उदाहरण पहा - त्यानंतरच्या श्रीकृष्णाच्या शिष्टाईने कौरव पक्षातल्या बऱ्याच जणांना पांडव पक्ष न्यायाचा आहे हे पटले होते. पण कौरवांचे मीठ खाल्ल्यामुळे ते त्यांच्या बाजूने युद्धाला उभे होते. त्यामुळे जयोऽस्तु पांडवानाय असेच त्यांना वाटत होते. त्यामुळे कौरवांचे सैन्य संख्येने जास्त होते तरी ते कचखाऊ होते. पांडवांचे सैन्य थोडे, पण पक्षनिष्ठ होते. त्यामुळे विजयाबद्दल दुर्योधन धास्तावलेलाच होता.

हे आणखी एक सुंदर उदाहरण बघा - अर्जुन उवाच - सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥ १.२१ इथे अर्जुनाने कृष्णाला अच्युत (जो च्युत होत नाही तो) म्हणून हाक मारली आहे. कारण अर्जुन इथे च्युत झालेला आहे. म्हणून त्याने कृष्णाच्या अनंत नामांपैकी हे नाव घेतले. आपण हृदयात धडधड सुरू झाली की डॉक्टरला बोलावतो. तसे अर्जुनाच्या हृदयात गडबड (युद्ध न करण्याविषयी) सुरू झाली म्हणून त्याने श्रीकृष्णाला अच्युत म्हणून हाक मारली आहे. गीतेमध्ये अशा रीतीने फार मार्मिक शब्दांची गुंफण केलेली आहे. हे बारकावे शास्त्रीजींची चाणाक्ष दृष्टी टिपून घेते. यावरून त्यांची अचूक, विवेचक दृष्टी दिसून येते.

भगवान श्रीकृष्णांनी अगोदर ठरवून नंतर शांतपणे अर्जुनाला गीतेतील आत्मा अनात्म्याची चर्चा सांगितली असती तर या गीतेला आताच्या इतकी गोडी राहिली नसती. अर्जुन सामान्यांचा प्रतिनिधी ठरला आहे, कारण त्याचे मन चंचल झाले. तो माघारी फिरला, कर्तव्यच्युत झाला व त्याने स्वत:चे स्खलन झाले आहे, असा प्रांजळपणे कबुलीजवाब दिलेला आहे. ह्यातच त्याचे मोठेपण आहे. जीवन संघर्षात आपणही असेच वागतो. त्याचेच हे दर्शन आहे म्हणूनच तो शूरवीर आहे, मोठा आहे, महान आहे. तो लढाईला घाबरत नव्हता. प्रतिपक्षाला आपण मारू असा आत्मविश्वास अर्जुनात होता. जो दुर्योधनात नव्हता. पण त्याचे दुष्परिणाम होतील, असे वाटत होते. म्हणून अर्जुन शूरवीर, नरवीर होता. असे शास्त्रीजी पुन्हा पुन्हा आवर्जून सांगतात.

ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग तुम्ही ऐकले असतील, पण येथे विषाद योग झालाय.

शास्त्रीजींनी टिपलेला हा बारकावा पहा - वज्रादपि कठोराणि मृदुनि कुसुमादपि । पुरुषाचे अंत:करण असे असायला पाहिजे, पण संजय शिष्टाईचा परिणाम होऊन अर्जुनाचे ठायी कारुण्यवृत्तीही निर्माण झाली हे एक कारण व दुसरे बृहन्नडा म्हणून अर्जुन एक वर्ष अज्ञातवासात असताना स्त्रियांच्या सहवासात होता म्हणूनही ही वृत्ती त्याच्यात निर्माण झाली व त्याची बुद्धिभ्रष्ट झाली. जे जन होते ते आता स्वजन (कौरव) वाटू लागले. अर्जुनाला राज्य, उपभोग नको होता म्हणजे कर्मप्रेरणाच खलास झाली होती. स्वार्थकर्मपरायणता जावी ही गोष्ट योग्यच. पण त्याचबरोबर कर्मप्रेरणा नष्ट होऊ नये ही पण गोष्ट सत्यच. स्वार्थ सुटल्यावर कर्म करण्यासाठी कोणती प्रेरणा शिल्लक राहील, या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी गीता प्रवृत्त झाली आहे.

गीतेची सुरुवात भक्तीनेच होते. तिचा शेवट पण भक्तीनेच होतो. अथपासून इतिपर्यंत गीता भक्तीने भारलेली आहे.

दुसऱ्या अध्यायात जे विचार सूत्ररूपाने सांगितले आहेत त्याचाच विस्तार गीतेत पुढे करण्यात आला आहे. कोणतेही कर्म करा, पण त्यामागे काम्यबुद्धी न ठेवता साम्यबुद्धी ठेवा. म्हणजे ते कर्म बंधनकारक न होता तुमचा विकास होईल. कर्म करून आध्यात्मिक विकास होऊ शकतो हे अर्जुनाला मान्य झाले, पण हे कर्म टाळून माझी आध्यात्मिक विकासाची साधना होऊ शकणार नाही का? दुसरे साधन आध्यात्मिक विकासासाठी नाही का?

भक्ती ही स्वतंत्रनिष्ठ कशी असू शकेल? कारण भक्ती हेसुद्धा कर्मच आहे. म्हणून तिचा अंतर्भाव कर्मनिष्ठेतच होणार. म्हणून ज्ञान व कर्म दोनच निष्ठा भगवंतांनी सांगितल्या. स्वतंत्र भक्तिनिष्ठा सांगितली नाही, कारण भक्ती अपरिपक्वापासून कर्मनिष्ठेत येईल व परिपक्व अवस्थेत ज्ञाननिष्ठेत समाविष्ट होईल. तिसऱ्या अध्यायात अशाप्रकारे आशयाचे विवेचन करून ते म्हणतात, गीता हा कर्मकांडी ग्रंथ नाही तर कर्मयोगाचा ग्रंथ आहे.

कर्माची अत्यावश्यकता व त्यातील अडचणी कशा दूर कराव्या, ह्याचे सुंदर वर्णन तिसऱ्यात आहे. शरीर भगवंत चालवतात. आपण शरीर माझे आहे म्हणतो, पण हे शरीर माझे नाही. माझ्यासाठी नाही आपण पोटात घास घालतो, पण पचन कोण करतं? लागलं तर डॉक्टर औषध देतात, पण जखम बरी कोण करतो? शरीर भगवंताचे आहे त्याचाकडून आपण ते भाड्याने घेतले आहे म्हणून त्याला कर (भाडे) द्यावेच लागते. त्याचेच नाव यज्ञ. या यज्ञाची भूमिका गीतेच्या १३ व्या अध्यायात १३.२ मध्ये भगवंत स्पष्ट करतात. या शरीराला क्षेत्र ठरवून त्याची मालकी स्वत:कडे ठेवून त्याचे भाडे वसूल करण्याचा अधिकार भगवंतांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे. हे शरीर फक्त तुझ्यासाठी नाही तर ते इतरांसाठी उपयोगी पडायला हवे. कर्मयोग कृतज्ञता व निष्काम बुद्धीने केला तर सोन्याला

सुगंधच. शास्त्रीजी या अध्यायाबद्दल एवढेच सांगू इच्छितात की, तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांनी शेवटच्या चार श्लोकांचा एकाग्रचित्ताने अभ्यास करावा. हे श्लोक उच्च तत्त्वज्ञानाने परिपूर्ण आहेत.

अध्याय १ ते ६ एक खंड. यात त्वम् (तू-जीव) पदार्थाचे वर्णन आले आहे. ७ ते १२ तत् पदार्थ म्हणजे प्रत्यगात्मा व परमात्मा यांचे ऐक्यवर्णन केले आहे. तिसऱ्या खंडात १३ ते १८ यात ज्यामुळे कर्तृत्वाभिमान कमी होतो ते खरे ज्ञान. ज्यांनी कर्तृत्वाभिमान भगवंताला अर्पण केला तेच लोक कर्तृत्वाभिमानरहित होऊ शकतात. म्हणून शेवटी भगवंतच परीक्षक व भगवंतच निरीक्षक. आपण न्यायाधीश होऊ शकत नाही. मी एकटा नाही, माझ्याबरोबर तो आहे. ही भावना ज्ञानाची परमोच्च स्थिती आहे.

अहम्चे सौंदर्य व तद्वारा आत्म्याचे दर्शन. शरीर फाडून ते मिळणार नाही. या अहम्चे सौंदर्य, भव्यता, महत्त्व जाणून घ्यायला हवे. या अहम्मुळेच सारे जग सुंदर दिसते. शास्त्रीजी सांगतात, या अहम्च्या आधारानेच बुद्धी काम करीत असते. म्हणून अहम्ची कदर केली पाहिजे. ज्या क्षणी अहम्चे सौंदर्य, भव्यता, महत्त्व लक्षात घेऊन त्याचक्षणी या अहम्मधूनच आपल्याला आत्मदर्शन होईल व ह्याच अहम्मधून आत्मा दिसेल इतका अहम् सूक्ष्म होतो. अहम् ठेवून भगवंताकडे पाहणे (म्हणजे झिरझिरीत बुरख्यामुळे स्त्रीचे सौंदर्य वाढते. कपडा असून मुख दिसते) असे पाहण्यात जो आनंद आहे तो अहम् एकरूप करण्यात नाही. ज्यांचा अहम् अशाप्रकारचा झालेला असतो ते लोक आध्यात्मिक होत.

अध्याय १४ वा फार महत्त्वाचा आहे. त्रिगुणांपासून निर्माण झालेल्या सृष्टीची कल्पना, गुणांचा आपल्यावरील प्रभाव व त्यातून सुटण्याचा सोपा मार्ग ह्या गोष्टी या अध्यायात सांगितल्या आहेत. गुणातीताच्या या अध्यायाला गुणातच बुडालेले आपल्यासारखे लोक काय न्याय देऊ शकणार? म्हणून केवळ नमस्कार करूया. शास्त्रीजी दर अध्यायाच्या शेवटी त्या अध्यायाला विनम्रपणे नमस्कार करून अध्याय-प्रवचन संपवतात.

शास्त्रीजी म्हणतात, स्थूल दृष्टीने १५ व्या अध्यायाकडे पाहिले तर त्यात वेगवेगळे पंधरा विषय भगवंतांनी निवडलेले आहेत. त्या सर्वांचा थोडक्यात परामर्श घेतलेला आहे. लहान, पण अतिशय महत्त्वाचा अध्याय. संसाराचे मिथत्व, संसार तापत्रय विमोचनाचा उपाय, ब्रह्मस्थितीचे दिग्दर्शन, जीवाशिवाचा संबंध, जीवाचा जगाशी संबंध, जीवाची पुनरावृत्ती वगैरे वगैरे विषयांचा यात अंतर्भाव आहे. शास्त्रीजी म्हणतात, मुंबई शहर स्थितप्रज्ञाचा आदर्श आहे. इथल्या चाळीत एका घरी बारसे चालू असते तर दुसऱ्या घरात बारावे. इथे कोणाला मेल्याचे दुःख नसते की जन्मल्याचा आनंद. बुद्धी अहम्ला पकडून भोगशक्तीकडे न वळता ज्ञानशक्तीकडे वळली तर बुद्धिमान होता येते. आपण आत्मसाक्षात्कारी व्हावे व कृतकृत्य व्हावे, असे सूचित करून भगवंतांनी हा पंधरावा अध्याय पुरा केला आहे. एंजेल्स, बर्ट्रांड रसेल, कांट, हेगेल वगैरे पाश्चात्त्य तत्त्ववेत्यांच्या मतमतांतराची सोदाहरण चर्चा शास्त्रीजींनी यात केलेली आहे. शास्त्र प्रमाण मानून जीवन चालव. भौतिक, नैतिक व आध्यात्मिक या तीनही प्रकारच्या उन्नती साधण्यासाठी काम, क्रोध व लोभ यापासून विमुक्त व्हायला हवे. विमुक्त होणे म्हणजे मारणे नव्हे, असे गीता सांगते. कामाचा नाश करू नको तर त्या कामाला दास कर, वश कर. सतराव्यात बुद्धिवाद व श्रद्धा यांचे साहचर्य, संकलन, व्यवहारात श्रद्धेचे स्थान, श्रद्धेचे स्वरूप, श्रद्धा व तिचे प्रकार, ज्ञान



व श्रद्धा यांचा समन्वय. अशी सविस्तर चर्चा या अध्यायात केलेली आहे.

शास्त्रीजी म्हणतात, आज भगवान श्रीकृष्ण पुन्हा आले तर नव्या पिढीला अश्रद्धाळू ठरवून मानखंडना करणार नाहीत पण मूर्ख मात्र निश्चित ठरवतील. तुमच्यापासून जे अपेक्षित आहे ते न करता तुम्ही वेगळेच करीत आहात. तुमच्याकडून लेखकाच्या लेखणीला स्फुरण चढेल असे जीवन जगावे अशी अपेक्षा आहे. तरुणींनाही भगवंत असेच सांगतील. तुमच्या ऊर्मीने तुम्हाला अशी प्रेरणा द्यायला हवी की तुम्ही केवळ अबला नाही तर महिला आहात. तुम्ही भोगदासी व्हायला जन्मलेल्या नाहीत तर महिषासूरमर्दिनी आहात, महालक्ष्मी, महाकाली, महासरस्वती आहात. श्रद्धा व बुद्धीचा उत्कृष्ट मेळ घडवून आणणारा हा अध्याय जीवनाच्या कर्माच्या बाबतीत दैवी मार्गदर्शन करीत आहे.

उपसंहारात्मक अठरावा अध्याय. सर्व विषयांची एकवाक्यता करून सर्वोच्च सिद्धान्त सांगणारा अध्याय आहे. दुसऱ्या अध्यायात विषय प्रवेश व या अध्यायात विषयाचा समारोप. अशा प्रकारचे असे अत्यंत पद्धतशीर लेखन फार थोडे पहायला मिळते. स्पेन्सरची लेखन पद्धती गीतेसारखी आहे, असे शास्त्रीजींचे म्हणणे आहे.

अज्ञान किंवा कंटाळा म्हणून कर्मे सोडणे याला क्षूद्र त्याग म्हणतात. इतकेच नव्हे तर असा त्याग ज्ञानाला बाधक व अधोगतीला नेणारा असतो. म्हणून तुला कसलीही गरज नसली तरी तू कर्मे करीत राहिले पाहिजे. हीच तर श्रेष्ठता होय. काम्य व नियतकर्माचा न्यास करून (निष्काम कर्म) कर्मे करणे, याचे नाव संन्यास. काम्यकर्माचा त्याग व विकासात्मक कर्मे करणे याचे नाव त्याग. भगवंत म्हणतात की, काम्याना कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।

सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥१८.२॥

काम्यकर्माचा त्याग व विकासात्मक कर्मे करणे याचे नाव त्याग. यज्ञ, दान, तप ही पवित्र कर्म असल्यामुळे ती कधीही सोडू शकत नाहीस. ही कर्मे तू केलीच पाहिजेत. (कार्य मेव तत्) असे जोर देऊन सांगतात.

शास्त्रीजी सांगतात की, लोक म्हणतात, कर्म करण्यापेक्षा रामनाम् जपावे. त्यात काय वाईट आहे? त्याचे उत्तर भगवंत १८.७ या श्लोकात देतात. तुझ्यावर येऊन पडलेले कर्म तू मोहाने सोडलेस तर तुझा त्याग हा तामस त्याग होईल. (नियत कर्माचा त्याग करणे हे बरोबर नाही.) गीताच असे हंटरचे फटके देऊ शकते, असे शास्त्रीजी म्हणतात. सर्वच श्लोक इतके महत्त्वाचे आहेत की आपण त्यावर दोन दोन दिवस बोलायला हवे. पण आपण सिंहावलोकन करीत आहोत, नाहीतर एका श्लोकावरून दुसऱ्यावर जाताच आले नसते. तिथेच बसून राहावे असे माझ्या मनात येते. इतके हे महत्त्वाचे व प्रभावी श्लोक आहेत.

**गीता ही सामान्य लोकांसाठी आहे. महान पुरुषांकरिता तर्ककर्कश, गहन असे पुष्कळ ग्रंथ आहेत. परंतु गीता सर्वसामान्य माणसाच्या कर्मात तीव्रता यावी, वेग यावा व त्याच्या आसक्तीकडे व फळाकडे लक्ष जाऊ नये अशी हिंमत देते.**

शास्त्रीजी म्हणतात की, विज्ञान इतके प्रगत झालेले, ज्ञान हा मानवाचा पुरुषार्थ आहे. याविषयी मी मानवाच्या पुरुषार्थाला कमी लेखत नाही. मानवाच्या पुरुषार्थाला पूजनीयच मानायला हवे. पण या शोधाच्या मागे दैवाची, अलौकिक प्रेमळ तत्त्वाची इच्छाच पाठीशी आहे. 'दैवं चैत्राव पंचमय' विज्ञान वाढावे व माणसांनी एकमेकांचे सुख पहावे अशी ईश्वरी इच्छाच होती. म्हणून जेम्स वॅटने बाष्प शक्तीचा शोध १४ व्या वर्षी लावला. न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा, राईट बंधूंनी विमानाचा शोध लावला असे शास्त्रीजींना वाटते. माणसाच्या प्रयत्नांच्या पाठीशी त्याच्या पुरुषार्थापेक्षा काही वेगळेच तत्त्व आहे. सृष्टीने आपली कित्येक रहस्ये गॅलिलिओला, मार्कोनीला सांगितली

असतील, म्हणून मार्कोनीने वायरलेसचा शोध १९ व्या वर्षी लावला, गॅलिलिओने सोळाव्या वर्षी दुर्बिणीचा शोध लावला. आपल्या ज्ञानेश्वरांप्रमाणे परदेशातही असे पूजनीय ज्ञानेश्वर झालेले आहेत. सांगण्याचे तात्पर्य इतकेच की माणसाच्या प्रयत्नांच्या पाठीशी एक अतिंद्रिय शक्ती आहे. यात माणसाचे प्रयत्न तर आहेतच. पण मानवी प्रयत्नांच्या पाठीशी हे सर्व विज्ञानाचे फायदे घ्या, असे सांगणारी अतिंद्रिय शक्ती आहे. ती अशाप्रकारे दैवं चैत्राव पंचमयूचा महान् सिद्धान्त भगवंतांनी सांगितला आहे. मी फक्त दैव प्रारब्धालाच मानतो असे एखाद्याला वाटेल. परंतु तसे नाही. विकासार्थ कर्मे करण्यात पुरुषार्थाला प्राधान्य व दैवाला गौण स्थान आहे. ज्यावेळी जीवनात सुख-दु:खे येतात त्यात दैवाचा प्रमुख वाटा व पुरुषार्थ गौण, पापपुण्याच्या बाबतीत पुरुषार्थ प्रमुख व दैव गौण, असे प्रांजळपणे विवेचन करून दैव व पुरुषार्थ यासंबंधी हल्ली सुरू असलेली गडबड व गोंधळ कमी करण्याचा प्रयत्न करतात.

शास्त्रीजींनी मधे मधे सुंदर दृष्टांत, व्यवहारातली चपखल बसणारी उदाहरणे, विवेचन, चर्चा यांची प्रवचनांमध्ये मखमली पखरण केलेली आहे. त्यामुळे अध्यात्मासारख्या गहन विषयाची क्लिष्टता, गूढ, गहनता जाणवत नाही. आता हेच वानगीदाखल उदाहरण पहा - गीता ही बॅटरी आहे. **कोणी म्हणेल बॅटरीचा प्रकाश किती पोहोचेल ! शंभर फुटापर्यंत मला जायचे आहे. बॅटरी म्हणते, तू मूर्ख आहेस. अरे चालू लाग. तू जितका चालू लागशील त्याच्या शंभर फूट पुढे मी आहेच असे समजून चाल.** गीतेचेही असेच आहे.

इथे अर्जुनाची ज्ञानसमाधी व भावसमाधी लागलेली आहे. फक्त अर्जुनाला किंवा अर्जुनासारख्या समजूतदार लोकांनाच त्याची किंमत कळणार ! बाजारात गीता २५ पैशाला मिळते; परंतु हे गीतेचे खरे मूल्य आहे का? जीवनाचा सर्वस्वभाव हेच गीतेचे मूल्य. म्हणून भगवंतांनी अर्जुनाला जागे केले, 'अरे गृहस्था ! उठ ! उठ ! त्यावेळी हा महान भक्त भानावर येतो व तृप्ततेचा ढेकर देत सांगतो. 'नष्टो मोह... (१८.७३). अर्जुन पुष्कळ ठिकाणी काही ना काहीतरी बोलला आहे. पण त्या श्लोकात विलक्षण गोडवा आहे. ही बुभुक्षिताची भाषा नाही, भित्रटाची भाषा नाही, कोणत्याही प्रकारची अभिलाषा किंवा मागणीची भाषा नाही. 'नष्टो मोह:' बस. खलास. इथे गीता पुरी होते. मी समजलो मी कोण आहे. आता मला कोणी चलित करू शकणार नाही. हा श्लोकच गीतेचे सार आहे.

गीता योगेश्वर कृष्णाची आहे. आपण एकेका ओळीचे मनन करत पारायण केले तर फारच सुंदर होईल. 'यदल्प तब्दहु' म्हणून एका ओळीतच माणूस जागृत होईल. एका ओळीचे पारायण करताना 'एषा ब्राह्मी स्थिती:' पार्थाचा अनुभव प्राप्त होईल. प्रत्येक श्लोक गायला लागलो की त्या ठिकाणी भगवंताचा अभिनय वेगळा आहे, प्रत्येक श्लोकात त्याचे अवयव बदलतात, दृष्टी बदलते असे वाटल्याशिवाय राहणार नाही, असे शास्त्रीजींनी फार मार्मिक विवेचन केलेले आहे.

प्रत्येक ठिकाणी भगवंताचे काही ना काही फटके आहेत. ते गोड फटके खाता खाता जर गीता वाचली तर गीतेचे शुभफळ मिळेल. खरोखर त्यांनी गायिलेले शब्द महत्त्वाचे आहेत. ते भगवंताच्या तोंडून निघालेले शब्द मी माझ्या ओठातून काढतो, असे माणसाला जेव्हा वाटते तेव्हा ओठालाही गुदगुल्या होतात. ज्या ठिकाणी शब्दाची मोहिनी आपल्याला भुलवते ते शब्द ज्यावेळी योग योगेश्वरात कृष्णात् साक्षात् - श्री भगवंताच्या मुखारविंदातून निघालेले असतील त्यावेळी प्रत्यक्ष शब्द ऐकणाऱ्यांना काय बरे वाटले असेल? बिंबाचे हे शब्द आहेत, प्रतिबिंबाचे नाहीत, छापलेले हे प्रतिबिंब आहे. प्रतिबिंबात ओज नाही, भाव नाही, हृदय नाही म्हणून साक्षात् कथयत: स्वयं म्हटलेले आहेत.

हे अर्जुना ! विविध प्रकारचे चांगले वाईट भाव तुझ्या

'अहम्'वर स्वार होत असतात. त्यावेळी तुला वाचवणारा तुझा संरक्षक दुसरा कोणी नसून तुझा संरक्षक ईश्वर आहे. ईश्वर: सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । हे अर्जुना ! तुझा अहम् त्या विशुद्ध अहम्‌शी एकरूप केलास तर? जीवन आत्मविजयी व आनंदी होईल.

शास्त्रीजी म्हणतात, कित्येक उथळ लोक म्हणतात की, Sermons on the mount सारखा ग्रंथ जोपर्यंत आहे तोपर्यंत गीता नाही वाचलीत तर चालेल. अशा अक्कलशून्य बेजबाबदार लोकांना तर आपली स्थिती (stage) काय आहे हेच माहिती नसते म्हणून असे भलतेच काहीतरी बोलत असतात. पण गीता ही गीताच आहे.

'अर्जुना ! तुला काय सांगू? हे जे ज्ञान आहे ते अतिशय गुह्य आहे. आता आणखी काही सांगायचे राहिलेच नाही.' असे भगवंतांनी सांगून टाकले. अहम् हे जीवाचे शेवटचे वस्त्र. जीवन एकेक वस्त्र टाकीत चालला आहे व त्याचे अहम् हे शेवटचे वस्त्र राहिले आहे. नग्नो नि:संग शुद्ध: हे शेवटचे वस्त्र सोडणे हे गुह्यात गुह्यतम् आहे.

गीतेचा शेवटचा उपदेश भगवंत जोर देऊन अर्जुनाला सांगतात की, जो आत असलेला विशुद्ध अहम् आहे त्याला तू शरण जा ! मग तुला परमशांतीस्थान प्राप्त होईल. भगवान श्रीकृष्ण किती महान बुद्धीनिष्ठ आहेत ! मन्यना भव. अर्जुना माझ्या ठिकाणी मन ठेव. माझा हो. हा श्लोक काठोकाठ भावभक्तीने भरलेला आहे. 'ये अर्जुना, जवळ ये. मला चिकटून बस !' कितीही जवळ गेला तरी अजूनही जवळ यावा असे वाटत असल्यामुळे भगवान आर्जव करीत आहेत असे या श्लोकात वाटते. 'अजून जवळ ये' ही स्थिती सगुणाची पराकाष्ठा आहे. त्यानंतर निर्गुणाची पराकाष्ठा समजून देतात. र्सधर्माप्नपरित्यज्य मामेकं शरणं व्रज । १८.६६ सर्वच उपाधी काढून ठेवणे, ही स्थिती म्हणजे निर्गुण अवस्थेची पराकाष्ठा होय. म्हणजे ही जी स्थिती ती सर्वधर्मान परित्यज्यची आहे. धर्म सोडून द्या म्हणजे हिंदू, शीख, ख्रिस्ती, पारशी, इस्लाम हे धर्मच नव्हेत. माणसाचा एकच धर्म आहे. तो त्याला चिकटलेला 'स्व', तो काढायचा आहे. ह्या 'स्व' मधे सारे जग आले, संपूर्ण द्वैत आले. ते 'स्व' मधे आहे म्हणून सर्वच काढून टाक, अशी स्थिती म्हणजे पूर्णतेचा अनुभव. ही स्थिती क्षणभर जरी अनुभवायला मिळाली तरी त्याला कोणत्याही प्रकारचे पाप नाहीच, अशा तऱ्हेने निर्गुणाची पराकाष्ठा सांगितली.

यानंतर पुढची गोष्ट सांगतो, असे शास्त्रीजी म्हणतात ती भगवंताची वाणी व भगवंताचे रूप याविषयी. त्यावेळी भगवंताची वाणी वेगळी होती व रूपही वेगळे होते. त्यावेळी भगवान हे नंदाचा मुलगा नंदलाल नव्हते. जगत् ज्याचे मूल आहे असे 'वासुदेव'... विश्वाचा स्वामी होते म्हणून व्यासांनी गीतेत कोठेही श्रीकृष्ण उवाच म्हटलेले नाही, असे ते भगवान उवाच झाले. त्याचवेळी सर्व शक्ती त्यांच्या ठिकाणी आविष्कृत झालेली होती. म्हणून त्यांचे रूप व वाणी ही अलौकिक होती. संजयाने संस्मृत्य संस्मृत्य मी वेडा होऊन गातो आहे, नाचतो आहे. इतके सांगून शेवटी ध्यानात ठेवण्यासारखे भविष्य सांगून टाकले आहे. 'यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: । तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मय ॥ १८.८७ या श्लोकाने.

<u>सत्तेजवळ सत्य जात नाही. तरीही ज्याच्यासमोर अपील नाही त्याच्या राजा धृतराष्ट्राच्या तोंडावर सांगण्यात जी निर्भयता आहे ती गीता ऐकून संजयात आली आहे असे वेद व्यासांना सांगायचे आहे.</u> असे शास्त्रीजी म्हणतात, निर्भयता हेच गीतेचे फलित आहे. गीतेसारखा अलौकिक ग्रंथ म्हणजे त्रैलोक्यनाथाने घेतलेले साकार रूप. वाङ्मय मूर्ती श्रीहरीची. आपला आत्यंतिक, आत्मीय, लाडका मुलगा जो अर्जुन त्याच्याजवळ हृदय मोकळे करून त्याला जे सांगितले त्याचे रहस्य समजायला लोकोत्तर बुद्धी, अलौकिक श्रद्धा व दैवी भाव यांची गरज आहे. आमच्यासारखे बुद्धीने पांगळे, श्रद्धेने दुबळे व भावाने ढिले

असे लोक त्याला न्याय तर देऊ शकणार नाहीत. आम्ही तो समजू शकू की नाही याचीच शंका आहे. म्हणून या लोकोत्तर ग्रंथाला प्रणाम करून ही वाङ्मय पूजा पुरी करतो, असे शास्त्रीजी विनम्रपणे अखेरीला म्हणतात. तो त्यांचा विनय आहे. वास्तविक सार्थ गीता वाचणे म्हणजे गीता समजली असे नव्हे. गीतेच्या श्लोकाच्या दोन ओळींच्या मधला भावार्थ शास्त्रीजी जो आपल्या प्रवचनांमध्ये उलगडून दाखवतात तो लाजजबाब आहे. त्याला तोड नाही. भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेली गीता व त्यावरची प.पू. शास्त्रीजींची प्रवचने म्हणजे सोन्याला सुगंधच. त्यांचे अफाट वाचन, अगाध ज्ञान व त्याला साधनेची डूब यामुळे त्यांच्या प्रवचनांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. गीता समजून आचरणात आणायला या ग्रंथाची फारच मदत होईल, असा हा 'गीतामृतम्' ग्रंथ तुम्हाला सहज दुकानात उपलब्ध होऊ शकणार नाही. स्वाध्याय परिवारातील एखाद्या स्वाध्यायीकडूनच तुम्हाला तो मिळू शकेल. पण तसा तो मिळवणे अशक्य नाही, कारण त्यांचे स्वाध्यायी जागोजागी आहेत. शास्त्री दर अध्यायाला प्रणाम करून अध्याय संपवतात. तसेच मी भगवान श्रीकृष्णांना, गीतेला व शास्त्रीजींना प्रणाम करून इथेच थांबते.

**आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१४०

दिशा
oZ`o_V ohMVm

(पान क्र. ८ वरून)

## प्रमुख पाहुणे डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे दीक्षान्त भाषण

तुमच्या अपयशातून जास्त शिकू शकाल. म्हणून अपयशाचा बाऊ करू नका. धोका पत्करा किंबहुना राष्ट्रीय परिवर्तनाच्या धोरणात धोक्याचा समावेश आवश्यकच आहे.

काही गोष्टी ठामपणे सांगून मला माझ्या भाषणाचा शेवट करणे आवडेल. भविष्यकालीन भारतासाठी आपणाला तीन गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात, इतकेच नव्हे तर आचरणात आणायला हव्या. या तीन गोष्टी संक्षिप्त रूपाने TI या संज्ञेत बांधता येतील. पहिली गोष्ट अशी की, TI ही संज्ञा 'थिंक इंडिया'साठी आहे. आपण भारताचा विचार केला पाहिजे. आपले विचार आणि भावना भारताशीच निगडित असल्या पाहिजेत. कोणीतरी म्हटल्याप्रमाणे WTO ला भारताचे उत्तर WTI म्हणजेच 'वुई थिंक फॉर इंडिया' हे असले पाहिजे. TI चा दुसरा अर्थ असा की, संपूर्ण भारत एकसंधच नाही तर एकसंघही आहे. म्हणून 'टीम इंडिया' हा विचार विसरता कामा नये. संघभावनेने विचार आणि काम विनासंघर्ष झाले पाहिजे. पुढे जाण्यासाठी सतत झटले पाहिजे. TI म्हणजे 'टोटल इनोव्हेशन' असेसुद्धा समजले पाहिजे. सामाजिक, वैधानिक आणि आर्थिक संरचना बदलून नेहमी काहीतरी वेगळे करण्याचा प्रयत्न असला पाहिजे. आपण सर्वांनी एक महत्त्वाची प्रतिज्ञा केली पाहिजे की, इंडियातील 'आय' हा इनोव्हेशनमधील 'आय' झाला पाहिजे. जर आपण 'थिंक इंडिया' म्हणजे भारताचा विचार केला, 'टीम इंडिया' म्हणजे संघवृत्तीने काम केले आणि 'टोटल इनोव्हेशन' म्हणजे नवीन काम करण्याची वृत्ती अंगी बाणवली तर माझी पक्की खात्री आहे की, भारताचे अत्युच्च स्थान अटळ आणि अढळ राहील!

•••

# हस्तलिखितांची परंपरा व भारतातील हस्तलिखित संग्रह करणारी ग्रंथालये

ग्रंथालयशास्त्र निष्णात परीक्षेसाठी सादर करण्यात आलेल्या संशोधन प्रकल्पातील काही भाग. या प्रकल्पासाठी अर्चना पुजारी यांना प्रा. मोहन पाठक यांचे मार्गदर्शन लाभले होते. - *संपादक*

मनुष्यप्राण्यास निसर्गत:च स्मरणशक्तीची जोड मिळाल्यामुळे प्राचीन काळापासून त्याने आपले ज्ञान पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केलेले आहे. यासाठी मौखिक व लिखित दोन्ही पद्धतींचा त्याने वापर केला. [१] लेखनकला अवगत होण्यापूर्वी मौखिक परंपरेद्वारे ज्ञानाचे जतन केले गेले. परंतु मौखिक परंपरांचे तोटे लक्षात आल्यामुळे मनुष्याने आपल्या बुद्धिचातुर्याने लेखनकलेचा शोध लावला.

पूर्वी जो मसुदा चिरकाल टिकावा अशी अपेक्षा असे तो शिला, इष्टिका , सुवर्णपट, ताम्रपट, पितळेच्या - काशेच्या - लोखंडाच्या साधनांवर लिहिला जाई. रोजच्या व्यवहारात वापरावे लागणारे साहित्य व ज्ञान ताडपत्र, भूर्जपत्र, लाकडी पाटी, रेशमी कापड, कातडे, कापड, कागद इत्यादी साधनांवर लिहिले जाई. याशिवाय कमलपत्राचा व भूर्जपत्रांचा उपयोग पत्रलेखनासाठी केल्याचा उल्लेख कालिदासने शांकुतल नाटकात व कुमारसंभव काव्यात केला आहे. उग्र वृक्षाची सालही लेखनासाठी वापरली जाई. चर्म-पत्रांचा विशेषत: बकऱ्याच्या कातड्याचा उपयोग भारतापेक्षा युरोपात अधिक झाला. नेपाळमध्ये अद्याप काही ग्रंथ गजचर्मावर नररुधिराने लिहिलेले सापडतात. [२]

भारतात लेखनासाठी वापरला जाणारा कागद व शाई हे अत्यंत उत्कृष्ट दर्जाचे असत. पंधराव्या शतकात विदेशात अशा भारतीय कागदास व भारतीय शाईस खूप मागणी होती.[३] शाईमध्ये बाभळीच्या डिंकाचा वापर केल्याने अक्षर चमकदार दिसे. भारतामध्ये हस्तलिखितांचे लेखन करणे हीदेखील एक कला समजली जाई. त्यामुळे अतिशय कष्ट घेऊन लिहिलेली ही हस्तलिखिते जतन करणे महत्त्वाचे मानले जाई. भारतात पुरोहित वर्ग, कायस्थ वर्ग, पाठशाळा, राजे व धनिक लोक यांनी हस्तलिखितांच्या जतनाचे कार्य केले.[४] यासाठी काही उपाय योजले जात. हस्तलिखितांना ऊन देणे, कृमी-कीटकांपासून हस्तलिखितांचे संरक्षण करण्यासाठी वेखंड, काळे जिरे, कापूर आणि मिरी यांचे मिश्रण करून ते कापडी पुरचुंडीत बांधून हस्तलिखितांवर ठेवणे.[५], धोतऱ्याच्या पानांच्या रसात वेखंड व कोळसा यांची वस्त्रगाळ पूड व थंड पाणी एकत्र करून हे मिश्रण पोथीच्या पानास लावून कृमींपासून हस्तलिखितांचे संरक्षण करणे[६], हस्तलिखितांच्या पानांमध्ये वाळवी लागू नये

(१) भट्टारक, चारुकिर्ती. 'मॅन्युस्क्रिप्टस् ट्रॅडिशन' मार्ग (मासिक) फेब्रुवारी १९८२ : पृ. २५

(२) अयाचित, स. मो. 'हस्तलिखितांचे संशोधन, लेखन व संरक्षण' विदर्भ संशोधन मंडळ (वार्षिक) १९८७ : पृ. १४८

(३) मंडपे, आशा 'विन्डोज टू द पास्ट', टाइम्स ऑफ इंडिया. २८ ऑक्टोबर २०००

(४) अयाचित स. मो. 'उनि पृ.५

(५) बेलसरे, व.भि. 'दुर्मिळ ग्रंथांचे संरक्षण'. साहित्य सहकार. मार्च १९५८ : पृ. ६

(६) लिमये, वि. ना. 'काही धोकादायक किडी'. मुद्रणप्रकाश. जानेवारी १९७७ : पृ. ३.

(७) तत्रैव. पृ. ४

यासाठी तंबाखूची पाने घालून ठेवणे[७], हस्तलिखितांना पानांमध्ये कसरीचा उपद्रव होऊ नये यासाठी त्यात सापाची कात ठेवणे.[८] बाभळीच्या डिंकाचा किंवा पिवळ्या अर्सेनिकचा लेप देणे[९], ताडपत्रावरील हस्तलिखितांना सिट्रोनेला तेल लावणे इ. उपाययोजना केल्या जात. आजही हस्तलिखितांच्या जतनासाठी विशेष काळजी घेतली जाते, कारण हस्तलिखितातून मिळणारी माहिती अतिशय विश्वसनीय समजली जाते. त्याचा पुरावा म्हणून वापर करता येतो. शिवाय लेखनकलेतील चढउतार व बदल, भाषांचे एकमेकांवर झालेले परिणाम यांचाही अभ्यास करता येतो. ज्ञानाचे आणि संस्कृतीचे वाहन म्हणून पोथ्यांचे महत्त्व वादातीत असल्यामुळे भारतीय संस्कृतीत पोथीदान करणे हे फार मोठे पुण्यकर्म मानलेले आहे.[१०]

ऐतिहासिक पुराव्यांनुसार आपणास असे आढळून येते की, प्राचीन कालातील मानवी नोंदी हातानेच लिहिलेल्या होत्या व त्यांची लेखन प्रकिया आणि पद्धती ही आजच्या लेखन पद्धतीपेक्षा निराळी होती.[११] आजची पद्धती पूर्वीच्या पद्धतीतूनच साकार झाली. आपणास असेही आढळून येते की, नोंदीसाठी वापरलेली साधने व साहित्य हे कालमानानुसार बदलत गेले. नोंद करण्यासाठी वापरण्यात आलेल्या निरनिराळया पद्धतींपैकी एक म्हणजेच हस्तलिखिते होय.

कोणत्याही प्रकारचा दस्तऐवज जो हाताने लिहिलेला आहे त्याला हस्तलिखित म्हटले जाते. हस्तलिखितांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

1) Harrod's Librarians glossary

"A document of any kind which is written by hand, or the text of a music or literary composition in hand written or type script form, and which in that form has not been reproduced in multiple copies. An illuminated manuscript is one which has been decorated as described under illuminated book."[१२]

2) Encyclopedia of Librariaship

Manuscript means - "any document written by the human hand with the aid of pen, pencil, or any other instrument which can be used with cursive facility as distinguish from an inscription engraved with chiesel or worked laboriously."[१३]

3) International encyclopedia of Information technology and Library Science

The word 'Manuscript' has been derived from the Latin word manus, meaning hand. Old English has word 'Manuscript' describes "writing with one's own hand opposed to

(८) पठाण, यु.म. 'प्राचीन हस्तलिखिते आणि त्यांचे जतन'. अस्मितादर्श. १९७० : पृ. १०७

(९) अयाचित स. मो. 'उनि पृ. ५

(१०) अयाचित स. मो. 'उनि पृ.

(११) करमरकर, प्रकाश गणेश 'प्रिझर्वेशन ऑफ लायब्ररी मटेरियल्स (अ स्टडी इन ओल्ड ॲण्ड लार्ज लायब्ररीज) 'प्रबंधिका. मुंबई विद्यापीठ, १९९२.

(१२) हॅरॉड्स लायब्ररीयन्स ग्लॉसरी ॲण्ड रेफरन्स बुक (५ वी आ.) ॲल्डरशॉट : गोवर ग्राफ्टन ॲण्ड कंपनी, १९८४ : पृ. १२७

(१३) लॅण्डाउ, थॉमस. एनसायक्लोपिडीया ऑफ लायब्ररीयनशिप (३ री आ.) लंडन : बॉवर ॲण्ड बॉवर, १९६६ : पृ. २८९.

(१४) रावत, पी. पी. ॲण्ड कुमार, टी. इंटरनॅशनल एनसायक्लोपिडीया ऑफ इन्फरमेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड लायब्ररी सायन्स (१ली आ.) दिल्ली : कॅसल बुक्स, १९९२: पृ. ३१४

printing."[१४]

## भारतीय ग्रंथालये

भारतामध्ये निरनिराळ्या कालखंडात राज्य करणाऱ्या राजांचे कला व विद्या यांबाबतचे धोरण उदार असल्यामुळे त्यांच्या काळात भारतात हस्तलिखितांच्या प्रसारास चालना मिळाली. अतिशय कष्ट घेऊन लिहिलेल्या अशा हस्तलिखितांचे जतन करण्याकडे त्यांचा कल होता. मात्र कालौघात त्याकडे दुर्लक्ष झाले असल्याने किंवा इतर काही कारणांनी हस्तलिखितांना दुर्दशा प्राप्त झाली. याबाबत गोपिराजबुवा यांनी केलेल्या सर्वेक्षणात त्यांना असे आढळून आले की, हस्तलिखितांचा संग्रह करणारे एक कुटुंब पाणी तापविण्याकरिता बंबास सरपण म्हणून हस्तलिखिते जाळत असत, तर काही ठिकाणी हस्तलिखिते वर्षानुवर्षे माळ्यावर कुजत राहिल्याने त्यांना वाळवी लागली. त्यामुळे ती गंगार्पण करणे, विहिरीत टाकणे इत्यादी प्रकारही केलेले आहेत.[१५]

गोपिराजबुवांना त्यांच्या सर्वेक्षणात असे चित्र दिसून आले असले तरी काही ठिकाणी मात्र हस्तलिखितांचा संग्रह करून जतन करणारी ग्रंथालयेही आपणास आढळतात. त्यापैकी काही ग्रंथालये तर केवळ हस्तलिखितांचे संग्रह, जतन व संरक्षण करणे, या हेतूनेच स्थापन केलेली आहेत.

### १) नालंदा विश्वविद्यालयाचे ग्रंथालय

भारतातील नालंदा विश्वविद्यालयाचे ग्रंथालय त्यामध्ये असणाऱ्या हस्तलिखितांच्या संग्रहासाठी प्रसिद्ध होते. या ग्रंथालयातील हस्तलिखिते असंख्य व अगणनीय होती. तीन प्रासादतुल्य इमारतींमध्ये हे ग्रंथालय होते. त्यापैकी एक इमारत नऊ मजल्यांची होती व त्या इमारतीत तीनशे कक्ष होते. या इमारतींमध्ये सर्व प्रकारची हस्तलिखिते जपून ठेवण्यात आलेली होती. मात्र कालांतराने बख्तार खिलजी नामक एका मुसलमान राजाने हे ग्रंथालय जाळले. ते सतत सहा महिने जळत होते. यावरून ग्रंथालयातील हस्तलिखितांच्या संख्येबाबत कल्पना करता येते.

### २) तंजावर महाराजा सरफोजी सरस्वती महाल ग्रंथालय

तंजावर येथील राजांच्या खाजगी ग्रंथालयांमध्येही हस्तलिखितांचा बराच संग्रह केलेला आढळतो. तंजावर येथील तेलगू नायकांनी सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात तेलगू लिपीत लिहिलेल्या संस्कृत हस्तलिखितांचा संग्रह केलेला आढळून येतो. अठराव्या शतकापासून मराठ्यांचा अंमल तंजावर प्रांतावर सुरू झाल्याने अठराव्या शतकातील मराठी हस्तलिखितेही तेथे आढळतात. तंजावरचा राजा सरफोजी याने इ.स. १८२० ते १८३० मध्ये बनासर येथे दिलेल्या भेटीत तेथील अनेक हस्तलिखिते आपल्यासोबत आणून आपले ग्रंथालय समृद्ध केले. या काळात या ग्रंथालयामध्ये अनेक भाषांतील आणि लिपीतील सुमारे २६,००० हस्तलिखिते होती. १८,००० कागदावर लिहिलेली, तर ८,००० हस्तलिखिते ताडपत्रावर लिहिलेली होती.

### ३) गव्हर्नमेंट ओरिएन्टल मॅन्युस्क्रिप्टस् लायब्ररी, मद्रास

या ग्रंथालयातील हस्तलिखितांच्या खालोखाल हस्तलिखितांचा संग्रह मद्रास येथील गव्हर्नमेंट ओरिएन्टल मॅन्युस्क्रिप्ट लायब्ररीत आढळतो. अठराव्या शतकात स्थापन करण्यात आलेल्या या लायब्ररीत संस्कृत आणि इतर दाक्षिणात्य भाषांमध्ये लिहिलेली सुमारे ५०,००० हस्तलिखिते आहेत.

### ४) भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर

इ.स. १९१७ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या अभ्याससंस्थेत २३००० हस्तलिखिते संग्रहित केलेली आहेत. या संस्थेद्वारे प्राचीन पंडित परंपरेला अनुसरून चालू असलेल्या शास्त्रांच्या

(१५) गोपिराज बुवा (रिधपूर) 'पोथ्यांचा नाश' मराठवाडा संशोधन मंडळ (वार्षिक) १९७५ : पृ. १७४

अध्ययन-अध्यापन कार्याला उत्तेजन देण्याचे कार्य केले जाते. शिवाय प्राच्यविद्येच्या म्हणजेच पौर्वात्य विद्यांच्या कक्षेत येणाऱ्या विषयांवर संशोधनही केले जाते.(१६)

### ५) गव्हर्नमेंट ओरिएन्टल लायब्ररी, म्हैसूर

म्हैसूर येथील गव्हर्नमेंट ओरिएन्टल लायब्ररीही हस्तलिखितांच्या बाबत समृद्ध आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजे इ.स. १८८१ मध्ये या ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. या ग्रंथालयात १०,७६५ हस्तलिखिते आहेत.

### ६) खुदाबक्ष लायब्ररी, पाटणा

मौलवी खुदाबक्ष याने स्थापन केलेल्या पाटणा येथील खुदाबक्ष ग्रंथालयात मुस्लिम साहित्यविषयक हस्तलिखितांचा संग्रह केलेला आहे. या ग्रंथालयात फारसी व अरबी भाषेतील एकूण ६०१० हस्तलिखिते आहेत.

### ७) सईदिया ग्रंथालय, हैद्राबाद

हैद्राबाद येथील सईदिया ग्रंथालयदेखील ऐतिहासिक साधनसामुग्रीच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. १९ व्या शतकात उदयास आलेल्या या ग्रंथालयात एकूण २१२५ हस्तलिखिते आहेत. त्यापैकी काही हस्तलिखिते १२ व्या शतकातील आहेत.

### ८) टिपू सुलतान संग्रह

टिपू सुलतान या म्हैसूरच्या राजाच्या संग्रहातही सुमारे दोन हजार हस्तलिखिते होती. इंग्रजांनी त्याचा पराभव केल्यानंतर काही हस्तलिखिते इंग्लंडमधील सार्वजनिक ग्रंथालयांना भेट म्हणून दिली. तर काही मद्रास फोर्ट विल्यम कॉलेजमध्ये आहेत.(१७)

### ९) वेंकटेश्वर ओरिएन्टल इन्स्टिटयूट, मद्रास

दक्षिण भारतात तिरुपतीच्या मंदिरात १८०० दुर्मिळ हस्तलिखिते संग्रहित केलेली होती. ही सर्व हस्तलिखिते इ.स. १९३९ मध्ये मद्रास येथील वेंकटेश्वर ओरिएन्टल इन्स्टिट्यूटच्या स्वाधीन करण्यात आली.

### १०) आधुनिक पद्धतीवर चालणारी ग्रंथालये

वरील केवळ हस्तलिखितांचाच संग्रह करणाऱ्या ग्रंथालयांव्यतिरिक्त भारतामध्ये आधुनिक पद्धतीवर चालणाऱ्या काही ग्रंथालयांमध्येही हस्तलिखितांचा विभाग ठेवण्यात आलेला आहे. अशा ग्रंथालयांची नावे व त्यात ठेवण्यात आलेल्या हस्तलिखितांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ग्रंथालयाचे नाव | हस्तलिखितांची संख्या |
|---|---|---|
| १) | कलकत्ता विश्वविद्यालयाचे ग्रंथालय | १२,२७५ |
| २) | अलाहाबाद विश्वविद्यालयाचे ग्रंथालय | ४०० |
| ३) | अलिगढ विश्वविद्यालयाचे ग्रंथालय | ४००० |
| ४) | बनारस विद्यापीठ | १३,३०० |
| ५) | मद्रास विद्यापीठ | १,७७२ |
| ६) | मुंबई विद्यापीठ | ४,००० |
| ७) | पंजाब विद्यापीठ | ११,५०६ |
| ८) | इम्पिरियल (नॅशनल लायब्ररी), कलकत्ता | १,४४९ |
| ९) | रॉयल एशियाटिक सोसायटी, बंगाल | ३२,००० |
| १०) | रॉयल एशियाटिक सोसायटी, मुंबई | २,००० |

**अर्चना पुजारी,**
ठाणे

(१६) 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळ (स्थापनेचा इतिहास)' मनोरंजन. जून १९१७ : पृ. ७९

(१७) 'हिंदुस्थानातील हस्तलिखित ग्रंथांची लूट' पुणे सार्वजनिक समाचार. जून १८८२ : पृ. ३१२

# मराठीतील समस्याप्रधान नाटके : एक विचार

*मराठी साहित्याचे अभ्यासक व संग्राहक श्री. सुधाकर फडके यांनी या लेखात मराठीतील समस्याप्रधान नाटकांच्या विकासावर दृष्टिक्षेप टाकला आहे. - संपादक*

**काव्येषु नाटकम् रम्यम्**

नाटकाची गणना काव्यात करणारे हे संस्कृत सुभाषित प्रसिद्ध आहे. परंतु नाटक या वाङ्मय प्रकाराचे काव्यापेक्षाही व इतर सर्वच वाङ्मय प्रकारांपेक्षा खास वेगळेपण हे आहे की, नाटकाचा रंगमंचावर प्रयोग होऊ शकतो; प्रेक्षकांच्या एका समूहाला, अभिनय नेपथ्यादि साधनांच्या सहाय्याने त्याचे प्रत्यक्ष दर्शन आणि श्रवण घडविता येते.

म्हणजेच नाटकामध्ये काव्याचे काही महत्त्वाचे गुण असतात, आणि त्याचबरोबर समूहाला आवाहन करण्याचे एक खास सामर्थ्यही त्यात असते. नाटककाराच्या या विशेष सामर्थ्याचाच सामाजिक परिवर्तनाशी संबंध येतो.

अगदी पूर्वीपासूनच सामाजिक वा राजकीय आंदोलनांची प्रतिबिंबे मराठी नाटकांत भरपूर प्रमाणात उमटलेली दिसतात. त्यासंबंधातील समस्यांना स्पर्श करणारी नाटके मराठी रंगभूमीवर वारंवार आलेली आहेत.

नाटक जेव्हा विष्णुदासी अवस्थेतून पुस्तकाकडे वळले तेव्हा सामाजिक परंपरांवर प्रहार करणारी किंवा त्याची तरफदारी करणारी अनेक छोटीमोठी नाटके लिहिली गेली, सामाजिक सुधारणा हा त्या काळातील जागता आणि ज्वलंत विषय होता. लोकांच्या विचारात आणि विवादात असलेल्या जरठबाला विवाह समस्येपासून विधवा विवाह समस्येपर्यंत अनेक विषय विशेषत: - पांढरपेशा वर्गाशी संबंधित असलेले - या नाटकांतून नाट्यरूपाने मांडण्यात आले आहेत.

याच काळात सामाजिक सुधारणेचे एक साधन म्हणून नाटक लिहिले जाऊ लागले. साहजिकच मध्यमवर्गीय जीवनाचे प्रतिबिंब यातून दिसू लागले. समाजातील सामाजिक समस्या नाटकांतून येऊ लागल्या. त्या काळात स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, इत्यादी चळवळी सुरू झाल्या व हे विषयही नाटकातून आले. लोकाभिरुचीला वळण लावण्याचे काम एखादे नाटक करू शकते, हे लक्षात घेऊन समाजमनावर परिणाम घडवणारी नाटके लिहिली जाऊ लागली.

**इंग्रजीतील समस्याप्रधान नाटकांचा उदय**

एकोणिसाव्या शतकात युरोपात ऑस्कर वाइल्डने 'लेडी विंडरमिअर्स फॅन' (१८९२), 'अ वूमन ऑफ नो इंपॉर्टन्स' (१८९२), 'आयडीअल हजबंड' (१८००) इ. नाटके लिहून सुखात्मिकेचे पुनरुज्जीवन केले. त्यांची समस्याप्रधान नाटके पारंपरिकच होती. 'जोन्स' व 'पिनीअरो' या नाटककारांनी सामाजिक समस्यांचे चित्रण केले. रंजनाबरोबरच माणसांच्या समस्या, सुखदुःखे यांचे दर्शन नाटक घडवू शकते, असा त्यांचा दावा होता.

'इब्सेन'ने मध्यमवर्गाचे जीवन व त्यांच्या समस्या आपल्या 'डॉल्स हाऊस' आणि 'पिलर्स ऑफ दी सोसायटी' या नाटकातून मांडल्या. 'जॉर्ज बर्नार्ड शो'ने 'विडोअर्स हाउसेस' (१८९२) 'द फिलँडरर' (१८९३), 'मिसेस वॉरेन्स प्रोफेशन' (१८९३) इ. नाटके लिहिली. तो समाजातील अपप्रवृत्तींचा, दंभांचा, ढोंगांचा उपहास करणारा कुशल नाटककार होता.

'ब्रेक्ट'ने आपल्या 'थ्री पेनी ऑपेरा', 'कॉकेशियन चॉक सर्कल' इ. नाटकांतून मार्क्सचे सामाजिक तत्त्वज्ञान मांडले. जीवनातील समस्या वस्तुनिष्ठ दृष्टीने विचारात घ्याव्यात, अशी त्याची अपेक्षा होती.

### मराठी रंगभूमीवरील समस्याप्रधान नाटकांचा प्रारंभ

इंग्रजी अमलाच्या सुरुवातीच्या काळात स्त्रीच्या विवाहविषयक समस्या प्राधान्याने समोर आल्या. मराठी रंगभूमीवर विधवांचे केशवपन, पुनर्विवाहाची संधी न मिळणे, सतीची पद्धत या समस्यांविरुद्ध पहिला आवाज रंगभूमीवर उठविला तो 'अण्णा मार्तंड जोशी' यांच्या 'सौभाग्यरमा' या नाटकातून. त्यानंतर देवलांची 'शारदा' अवतरली.

ब्रिटिशांच्या काळात औद्योगिकीकरण, शहरांची वाढ, इत्यादीमुळे समाजजीवन गुंतागुंतीचे होऊ लागले. समाजवाद महाराष्ट्रात शिरला. मराठी रंगभूमीवरही त्याचे पडसाद उमटले. १९३५ मध्ये 'नाट्यमन्वंतर'च्या 'आंधळ्यांची शाळा'ने परिवर्तन आले.

विवाह समस्यांशिवाय त्या काळातली आणखी एक समस्या होती, ती स्त्रीशिक्षणाची. त्याचे दुष्परिणाम होतील या भयाने 'तरुणी शिक्षण नाटिका' हे नाटक रंगभूमीवर आले. 'स्वैरसकेशा' या नाटकानेही स्त्री सुधारणेला विरोध केला.

आचार्य अत्रे यांनी निर्मला (घराबाहेर), करुणा (उद्याचा संसार), उल्का (जग काय म्हणेल?) या नायिका रंगवून वैवाहिक जीवनात स्त्रीच्या मनात होणारा जीवनमूल्यांचा संघर्ष प्रेक्षकांसमोर स्पष्ट केला. श्री. वि. वर्तक, अनंत काणेकर, यांच्या नाटकांतही स्त्रीविषयक समस्या मांडल्या गेल्या.

वैवाहिक जीवनात स्त्रीचे स्थान व दर्जा कोणता असेल? या समस्येस मो.ग. रांगणेकर यांनी 'कुलवधू' नाटकात हात घातला. सामाजिक वा राजकीय समस्यांना/विषयांना स्पर्श करणारी अनेक नाटके याच काळात मराठी रंगभूमीवर आली.

मामा वरेरकरांची प्रारंभीची काही नाटके वगळली तर पुढची बहुतेक नाटके कोणत्यातरी समस्यांशी संबंधितच आहेत. 'हाच मुलाचा बाप' हे 'हुंडा' समस्येवरील नाटक होते, तर 'सत्तेचे गुलाम' हे महात्मा गांधींच्या असहकार चळवळीवर आधारित नाटक होते. 'संन्याशाचा संसार' धार्मिक सुधारणांवर आधारित, तर 'सोन्याचा कळस' मजुरांच्या समस्येचे दर्शन घडविणारे नाटक होते.

### नवे वाङ्मयीन प्रवाह

दुसरे महायुद्ध संपल्यावर मानवी विनाशाच्या अनेक घटना घडल्या. राजकीय सत्तांची उलथापालथ झाली. समाजकारण, राजकारण, अर्थकारण यांचे रंग एकमेकांत मिसळून गेले व मानवी जीवनाचा अर्थ नव्याने शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले.

१९४०/४५ च्या सुमारास मराठीत नववाङ्मय निर्माण होऊ लागले. कवितेच्या क्षेत्रात 'बा. सी. मर्ढेकर' यांचा उदय ही अनेक दृष्टीने क्रांतिकारी घटना ठरली. मर्ढेकरांच्या कवितेने मराठी मनाला चांगलाच धक्का दिला व मराठी कवितेला गती मिळाली.

नवकवितेबरोबरच नवकथेचाही जन्म झाला. गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे, अरविंद गोखले यांच्या रूपाने मराठी कथा चांगलीच समृद्ध झाली. यांच्यानंतर जी.ए.कुलकर्णी, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, पानवलकर, पुंडलिक, दळवी या नव्या दमाच्या लोकांनी कथा प्रांतात दौड मारली.

त्यामानाने मराठीतील नव्या कादंबरीचा जन्म जरा उशीराच झाला असे म्हणावे लागेल. तसेच त्यातून जीवनाचे काही नवीन दर्शन घडत नव्हते. रंजनाचे फडके युग संपल्यानंतर महायुद्धोत्तर काळात मराठी कादंबरी पुन्हा एकदा वास्तविक जीवनाकडे वळली. नव्या कादंबरीची सुरुवात साधारणतः श्री. ना. पेंडसे यांच्या 'एल्गार' पासून झाली असे म्हणावयास हरकत नाही. पुढे दांडेकर-माडगूळकर यांनी हे क्षेत्र भरभराटीस आणलं. तर १९६० च्या सुमारास 'भालचंद्र नेमाडे' यांच्या 'कोसला'ने कादंबरीला नवी दृष्टी दिली.

१९४५ ते १९६० या कालखंडात मराठी रंगभूमीवर अशा अनेक घटना घडल्या की, त्याचा परिणाम रंगभूमीवर दिसू लागला. राज्य नाट्यस्पर्धा (१९४५), ललित कला केंद्राची स्थापना (१९५५), नाटकावरील करमणूक कर रद्द करणे (१९५८) 'रंगायतन' या नाट्यसंस्थेची स्थापना (१९६०) इत्यादी.

भारत स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती होईपर्यंत (१९४७ ते १९६०) राज्यात सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन शासकीय जी स्थिती होती तिच्यात नंतर पुष्कळच फरक पडला. नवसाहित्यिकांची पहिली पिढी साहित्यक्षेत्रात स्थिर व प्रतिष्ठित झाली आणि त्याचवेळेस दुसरी पिढी उदयास येत होती.

शैक्षणिक, राजकीय तसेच सामाजिक बाबतीत म्हणावयाचे झाल्यास साठ सालानंतर बहुजन समाजाच्या हातात राजकीय सत्ता आली. त्यामुळे ग्रामीण विभागात सुधारणा झाल्या. साखर कारखाने वाढले. ग्रामीण भागात शिक्षणसंस्था निघाल्या. शिक्षणप्रसार वाढला. दलित, ग्रामीण, आदिवासी, यांच्यातील तरुण पिढी शिक्षण घेऊ लागली. त्यांना शासकीय नोकऱ्या मिळाल्या. दलित चळवळी सुरू झाल्या. या प्रवाहाचे साहित्य लक्षणीय स्वरूपात दिसू लागले. या वर्गातील अनुभवविश्व तोपर्यंत मराठी साहित्यात अनोळखी होते.

रंगभूमीसंबंधात पहावयास गेल्यास जी मंडळी ६० पूर्वी हौशी वा प्रायोगिक चळवळीत होती तीच पुढे व्यावसायिक रंगभूमीवर स्थिरावली. उदा. विजय तेंडुलकर, शं.गो.साठे, पु.ल.देशपांडे, वसंत कानेटकर, रत्नाकर मतकरी इत्यादी. तदनंतर सतीश आळेकर, जयवंत दळवी, अच्युत वझे, वृंदावन दंडवते ही नावे त्यात समाविष्ट झाली. त्यांचे नाट्यकर्तृत्व मराठी रंगभूमीच्या भविष्याला मोलाचे ठरले. व्यावसायिक रंगभूमी त्या काळात ज्या विषयांच्या वाटेला जाण्याची सुतराम शक्यता नव्हती, असे विषय नाटककारांनी १९६० पूर्वी प्रायोगिक रंगभूमीवर आणले. मानवी जीवन किती गुंतागुंतीचे आहे. तसेच ते किती व्यामिश्र आहे हे दाखविण्याचे धाडस सुरुवातीच्या काळात प्रायोगिक रंगभूमीनेच केलेले आहे. आजही ही समांतर रंगभूमी नवे प्रयोग करतेच आहे.

**समाज आणि नाटक**

वाङ्मयनिर्मितीची पाळेमुळे समाजव्यवस्थेत रुजलेली असतात. साहियिकाचा पिंड घडविण्यास तत्कालीन विचारसरणी, तसेच साहित्यकृती ज्या काळात व परिस्थितीत निर्माण होते, त्या परिस्थितीचा प्रभावही कारणीभूत ठरतो.

लेखकाला नाटक सापडते ते एखाद्या विचारात, घटनेत, संघर्षात, एखाद्या व्यक्तिमत्त्वात किंवा एखाद्या समस्येत. वाङ्मयाच्या मूलतत्त्वाची आणि प्रेरणांची मीमांसा कोणी कशीही करीत, समाजाच्या जीवनात जेव्हा अटीतटीच्या समस्या उत्पन्न होतात तेव्हा त्याचे प्रतिबिंब नाटकात पडल्यावाचून राहात नाही. किंबहुना असेही म्हणता येईल की इतर वाङ्मय प्रकारांपेक्षा नाटकात ते अधिकच पडते, याचे कारण नाटक हे व्यक्ती-मनाप्रमाणेच, रंगभूमीद्वारा सामूहिक मनाशीही संपर्क साधू शकते.

थोडक्यात १९६० च्या आसपास शिक्षणप्रसार, लोकशाही, शिक्षण सवलती, व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, यांचा प्रभाव पडून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, धर्मनिरपेक्षता, बुद्धिवाद यांचा प्रभाव जनमानसावर पडत होता. जुन्या व्यवस्थांची निकडीने व नव्याने विचार करायची गरज वाटत होती. त्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा किंवा अस्वस्थ जाणिवांचा आविष्कार म्हणजेच स्वातंत्र्योत्तर साहित्यप्रकार होते. यात नाटकही आलेच.

**श्री. सुधाकर फडके**
१३, रविकरण, मुंबई-पुणे रस्ता,
कळवा - ४०० ६०५.

पुस्तक परिचय

# संथ सलील मंद लहर

**- मधुकर रामचंद्र देवधर**

कविता म्हणजे नक्की काय, हे सांगणे तसे अवघड. म्हटले तर जे गद्य नाही, ते म्हणजे पद्य किंवा उत्कट भावनांचा सौंदर्यपूर्ण आविष्कार म्हणजे कविता. प्रत्येक व्यक्तीच्या दृष्टीने कवितेची व्याख्या ही निराळी असते. पण सहजतेने जी अंत:करणातून स्फुरते आणि या वेगवान काळात जी टिकून राहते ती खरी चांगली कविता होय. म्हणूनच साहित्यात कवितेला मानाचे स्थान दिले गेले आहे. आपल्या आनंदाच्या-दु:खाच्या क्षणी नकळत आपल्या ओठांवर येऊन आपल्याला जी साथ देते, ती कविता. शालेय जीवनात वाचलेल्या अशा कितीतरी कविता आपल्याला आजही आठवतात. कारण कवितेचे रूप इतके लोभस, भाबडे असते की ते लगेच मनात घर करते व वर्षानुवर्षे आपल्यासोबत राहते. आज कवितेची एकूण वाटचाल पाहिल्यावर मराठी कविता किती समृद्ध आहे ते कळते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आज असेही अनेक प्रतिभावंत कवी आहेत ज्यांनी मराठी कवितेला एक नवी दिशा दिली. परंतु दुर्दैवाने अनेक कवींच्या कविता समाजापुढे पोहोचल्या नाहीत. तर काहींच्या कविता फक्त त्यांच्या डायरीपुरत्याच मर्यादित राहिल्या. असे अनेक कवी आज आपल्या आजुबाजूला आज कविता होऊन जगत आहेत. पण सर्वांनाच प्रसिद्धीची हावही नसते. असाच एक प्रतिभावंत, चिंतनशील कवी ठाणे शहरालादेखील लाभला. वयाच्या ऐंशीव्या वर्षांतही त्यांचे कवीमन तितकेच तरुण आहे. पण कवी म्हणून मिरवणे त्यांच्या स्वभावातच नाही. फक्त रसिकतेची हाव असणाऱ्या या कवीची आज चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. रसिकांची खरी दाद व सदिच्छा हेच कवितेचे मूल्य समजणाऱ्या श्री. मधुकर रामचंद्र देवधर यांची पुस्तके वाचण्याचा मला योग आला. त्यांच्या चारही काव्यसंग्रहांत मला जीवनाचे विविध अनुभव पहायला मिळाले. पण त्यांचा 'संथ सलील मंद लहर' हा काव्यसंग्रह लक्षणीय वाटला आणि त्याचा परिचय रसिकांना करून द्यावा, असे मनोमन वाटले.

२६ जानेवारी २००२ रोजी प्रकाशित झालेल्या या काव्यसंग्रहात अनेक अनुभवांचा काव्यखजिनाच आहे. त्यांची प्रत्येक कविता काहीतरी वेगळे सांगते. न्यूड पेंटिंगवर आधारलेल्या 'बॅलन्स' या कवितेतून (पृ. क्र. १७) माणसांची नैसर्गिक प्रवृत्ती व पेंटिंग हे फक्त कॅनव्हासवरच न उतरता ते तुमच्या मनातही उतरत असते व तुमचे मन भरकटू लागल्यावर आपला बॅलन्स कसा जातो, हे कदाचित कवीला या कवितेतून सुचवायचे आहे.

त्यांची 'फरक' (पृ. क्र. ४) ही कविता आजकालच्या 'पार्टी' संस्कृतीवर भाष्य करते. कवीला कवितेसाठी मिळालेला राज्य पुरस्कार आणि बातमी कळताच मित्रमंडळींनी केलेला मेजवानीचा गलका यावर आधारित कवितेत कवी पुढे म्हणतो की, सर्वांना मेजवानी प्रिय असते, पण ज्या कवितेला बहुमान मिळाला ती कविता ऐकण्याची कोणाचीही इच्छा नसते. या कवितेतून आजच्या जगाचे अचूक चित्रण केलेले आहे -

*मी म्हटलं तुलाही कळलं वाटतं*
*हा घे पेढा*
*ती हसत म्हणाली*
*पेढे मग घेईनच*
*पण ज्या कवितेला*
*पुरस्कार मिळाला*
*ती कविता*
*आधी म्हणून दाखवा ना -*

या काव्यसंग्रहातील 'बीज' (पृ.क्र. ३९) ही आणखी एक लक्षवेधी कविता असून निसर्गावर रूपक साधून मानवी जीवनात येणाऱ्या संधीचा प्रत्यय देण्याचा कवी येथे प्रयत्न करतो -

*वडाचं बीज*
*मोहरीइतकं लहान*
*त्याच्यातच सामावलेलं असतं*
*वडाचं प्रतिरूप*
*बीज फोडलं तर वृक्ष दिसत नाही*
*संधी मिळताच अंकूर फुटतो*
*दाट छाया देणारा*
*वृक्ष होतो महान*

'ध्यानस्थ बुद्ध' ही दुसरी एक कविता वास्तवतेची जाणीव करून देते. माणूस उगाचच सुखाच्या भ्रामक कल्पनेत अडकलेला असतो. दुःखाचे मूळ शोधण्यापेक्षा सुखाच्या काल्पनिक सीमांचा विचार करण्यात वेळ घालवतो. (पृ. क्र. ४४) -

*ते स्तूप अजून अनेक शतके*
*उभे राहतील*
*पण भेसळीच्या चुन्यात बांधलेली*
*आमच्या सारख्यांची स्मारकं*
*चार पावसाळ्यात धुपून जातील*

या कवीच्या ओळी माणूस परिस्थितीवर तोडगा न काढता कशा पळवाटा शोधत असतो, हे सांगतात. याच कवितेतील पुढील ओळींतून -

*मी मात्र चांगली सावली बघून बसलोय*
*आणि सुखाच्या काल्पनिक सीमांचा*
*विचार करतोय*
*पण त्याचं उत्तर सापडत नाही*
*माहीत आहे की त्याला उत्तरच नाही*
*माझ्या मनातला बुद्ध*
*अद्याप ध्यानस्थ आहे*
*तो जागाच होत नाही.*

सुखाच्या, मृगजळाच्या मागे धावण्याचा माणसाचा धर्म कवीने अगदी मोजक्या शब्दांत येथे चित्रित केलेला आहे. तसेच कवितेतून आलेले बुद्धलेण्यांचे व बुद्धाच्या मूर्तींचे चित्रण यावरून कवीची निरीक्षणशक्ती दिसून येते.

'सावली' या कवितेतून (पृ. क्र. ५३) कवीजीवनातील तीन टप्पे सांगण्याचा प्रयत्न करतो. तसेच सर्वांनी सोडले तरी पती-पत्नीला एकमेकांचा असलेला आधार व विश्वास हा किती महत्त्वाचा असतो, ही कवितेची मध्यवर्ती कल्पना खूपच सशक्त वाटते -

*झाली दुपार*
*तापलंय ऊन*
*रस्त्यावर झाडी नाही*
*पण एकमेकांची सावली आहे*
*आलटून पालटून*

आयुष्याच्या प्रवासात अनेक प्रकारच्या स्वभावाची माणसं भेटत असतात, पण प्रत्येकाशी जमवून घेणं हे आपापल्याच हातात असतं असा आशय व्यक्त करणारी गणिते (पृ. क्र. ५८) ही कविता खरंच दाद देण्यासारखी आहे. कमी शब्दांत जास्त आशय व्यक्त करण्याची कवीची शैली कवितेतून दिसून येते.

*काल भेटलेले आज भेटतील*
*उद्या दुसरे कुणीतरी*
*संभावित दिसणारे अगतिक -*
*आपल्या मनातील*
*गणिते सोडविताना*
*दुसऱ्याच्या अनुभवाशी*
*ताळे जमवताना*
*होतात आपण विद्यार्थी*
*आपणच परीक्षक*
*पास नाही नापास नाही*
*गुण कितीही मिळोत*
*त्याची मुळीच जाण नाही*

त्यांच्या या काव्यसंग्रहातील अनेक कविता उदाहरणार्थ काळजी, रस्ता, तुळशी, आसक्ती या

(पान क्र. ३९वर)

# अगस्त्य ऋषी

अगस्त्य ऋषी हा वशिष्ठांचा समकालीन ऋषी होता. तो शिवपार्वतीच्या लग्नात हजर होता, असा उल्लेख वैदिक वाङ्मयात मिळतो. तो व वशिष्ठ यांना कुंभोद्भव असे म्हटले आहे. अगस्त्य ऋषींच्या जन्माची हकिकत वैदिक वाङ्मयात अशी दिली आहे की, दक्ष प्रजापतीने अश्वमेध यज्ञ ज्यावेळी केला होता त्यावेळी नर-नारायण ऋषींची जोडीही यज्ञासाठी आलेली होती. त्या यज्ञात होमहवन वगैरे कामे झाल्यावर भोजनानंतर करमणुकीचे कार्यक्रम होत असत. त्या कार्यक्रमात एकदा उर्वशी या अप्सरेचा नृत्याचा कार्यक्रम ठेवला होता. त्यावेळी उर्वशी अत्यंत सुंदर दिसत होती. अलंकार व उत्तम पोशाख यामुळे तिचे लावण्य सुंदर दिसत होते. अलंकार व उत्तम पोशाख यामुळे तिचे लावण्य द्विगुणित झालेले होते. उर्वशीने असे काही नृत्य व संगीत सादर केले की त्यायोगे सर्व प्रेक्षक भारावून मंत्रमुग्ध झाले. अशा तऱ्हेने नृत्य करणाऱ्या उर्वशीस पाहून या नरनारायण ऋषींचे भान नष्ट झाले व तणिंचे रेतस्खलन झाले. ऋषींनी ते मौल्यवान रेत द्रोणात घेतले व नंतर 'कुंभात' ठेवले व नंतर ते निघून गेले, अशी कथा आहे.

'कुंभ' या शब्दाचा अर्थ विचारपूर्वक लावला पाहिजे, कोशार्थाप्रमाणे कुंभ याचा अर्थ, मातीचे भांडे, डेरा व घागर, धातूचे कोणत्याही पदार्थाचे भांडे असा आहे. लक्षणार्थ असा की, साठवण करण्यासाठी योजलेले सांभाळून ठेवणारे (भांडे -container) वस्तू असा जर घेतला तर स्त्रीचे गर्भाशय हासुद्धा एक कुंभच होय. नरनारायण हे विद्वान, सर्वज्ञ, बुद्धिमान असल्याने त्यांनी हे मौल्यवान रेत ठेवण्यासाठी योग्य कुंभ (स्त्रिया) शोधले व आपल्या सामर्थ्याने ते रेत त्या स्त्रियांच्या गर्भाशयात सुयोग्य प्रकारे स्थापन करून ऋषी तपाचरणास निघून गेले. ठराविक कालांतराने या स्त्रियांनी (कुंभ) पुत्रांना जन्म दिला. तेच हे अगस्त्यी व वशिष्ठ ऋषी होत. (ऋषित्व यांना विद्या प्राप्त होऊन तपाचरण केल्यावर त्यांना प्राप्त झाले.) म्हणून यांना कुंभज असे म्हणतात.

**उत्तराखंडाकडे प्रयाण**

या दोन्ही बालकांना त्यांच्या कुंभमातांनी १० वर्षे वयापर्यंत आपलेपणाने व प्रेमाने वाढवले. त्यांच्या जन्मापासून दहा वर्षांनी एक साधूंची जोडी त्या ठिकाणी आली व त्या बालकांना पाहून स्तंभित झाली व त्यांच्याबद्दल यांना प्रेम उत्पन्न झाले. त्यांनी त्या कुंभी मातांना सांगितले की, 'माते ही मुले भविष्यात महान, ज्ञानी व विज्ञान पुरुष होणार आहेत. ते जगन्मान्यता प्राप्त करून घेणार आहेत. त्यांचे स्मरण यावत्चंद्रदिवाकरौ जगतातील जनांना राहणार आहे. त्यांना अशा तऱ्हेचा पुरुष बनवण्यासाठी शिक्षण व संस्कार केले पाहिजेत. तेव्हा माते, या मुलांना दहा-बारा वर्षांपर्यंत आमच्या स्वाधीन कर. आमचे जगन्मान्यवर गुरुजी त्यांना शिक्षण देतील, संस्कार करतील. बारा वर्षांनी तेजस्वी, ज्ञानी, विद्वान होऊन तुला येऊन भेटतील. आमची तुला अशी कळकळीची प्रार्थना आहे, नाही म्हणू नकोस.' असे परोपरीने विनविले व त्यांना मनातून पटवून देऊन मन तयार केले व मुलांना घेऊन उत्तराखंडाची वाट धरली. वास्तविक ही आलेली साधूंची जोडी प्रत्यक्ष नरनारायण ऋषीच होते व आपल्या मुलांच्या कल्याणासाठी ते कुंभ मातेकडे आले.

नरनारायण मुलांना घेऊन (वशिष्ठ व अगस्त्यी) उत्तराखंडातील व्यासगुंफेजवळ आले व गुंफेत राहून मुलांना शिकवण्यास सुरुवात केली. थोड्याच दिवसांत शिव व दत्तात्रेय तेथे येणार असल्याचे त्यांना माहीत होते. नरनारायण ऋषींनी या दोन कुंभज पुत्रांना शिक्षण देण्यास शिव-दत्तात्रेय यांच्याशिवाय दुसरे कोणते महान गुरू योग्य होतील. हा विचार करून त्यांची गाठ घालून देण्यासाठी व्यासगुंफेत आणले. प्राथमिक शिक्षण नरनारायणांनी देण्यास सुरुवात केली.

यानंतर साधारणपणे २-२$^{१}/_{२}$ वर्षांच्या काळानंतर

दत्तात्रेय यांचे आगमन झाले. येताना त्यांनी भौम, अत्रि नावाच्या ८-१० वर्षांच्या मुलाला बरोबर आणले होते. दत्तात्रेय व नरनारायण यांनी या तिन्ही मुलांच्या शिक्षणाची व्यवस्थितपणे आखणी करून सुरुवात केली. ही तीन मुले बुद्धिमान, कष्ट घेणारी व उत्तम स्मरणाची होती. यांना दत्तात्रेयाच्या स्वाधीन करून नरनारायण ऋषीद्वय तीर्थयात्रा व तपाचरणास निघून गेले. दत्तात्रेयांनी या मुलांना चांगल्या आचार-विचारांचे शिक्षण दिले, उत्तम सवयी लावल्या, विचारांच्या योग्य दिशेला वळण लावले. बुद्धी जास्त प्रगल्भ करण्याचे प्रयत्न करण्यास शिकविले.

**सर्वांगीण शिक्षण**

योगसाधना, शरीरसाधना, धनुर्विद्या, अस्त्रविद्या, नक्षत्रशास्त्र, विश्वबोध, ग्रहतारेशास्त्र, जीवनशास्त्र, भूशास्त्र, जलशास्त्र, वनस्पती गुणदर्शन वगैरे उपयोगी शास्त्रांचे शिक्षण देऊन पारंगत केले, त्यांना चतुर्वेद विद्या, उपनिषदे, सर्व अंगांसह, रचना, अर्थ, उपयोग, साधना यांचे व्यवस्थित विवरण करून सर्व विद्येत विद्वान केले. या सर्व गोष्टीस ७-८ वर्षांचा काल गेला. त्यानंतर शिवाचे आगमन झाले. शिव हा सर्वत्र संचार करणारा, वनस्पतितज्ज्ञ, भूगर्भशास्त्र जाणारा होता, जगत्‌निर्मिती, वस्तू, वास्तुनिर्मिती व आयुर्वेद या मुलांना शिकविले व त्यांना ऋषिपद प्राप्त करून दिले व 'जगाच्या कल्याणासाठी आता तुम्ही निरनिराळ्या दिशेला जाऊन जगदोद्धार करा' असा उपदेश केला. विवाह करून आदर्श पुत्रोत्पत्ती करा व कालांतराने होणाऱ्या उमा-शंकराच्या विवाहाचे वेळी येऊन भेटा. विवाहसमयी तुम्हाला शिवप्रेरणाविद्येने - स्थलकालाची माहिती देतील असेही सांगितले. तेवढ्यात तेथे नरनारायण ऋषी आले. सर्वांच्या गाठीभेटी झाल्या. निरनिराळ्या विषयांवर चर्चा, देवाणघेवाण झाली व दत्तात्रेय व शिव तपाचरणासाठी निघून गेले.

**जगाच्या कल्याणासाठी**

नरनारायण ऋषी या मुलांच्या समवेत तेथून निघून कालांतराने या मुलांच्या कुंभमातांकडे आले. त्या मातांची व मुलांची पूर्वसंकेताप्रमाणे भेटी करवल्या. त्यांनी मुलांना शिक्षण व संस्कार देऊन जगदोद्धारासाठी तयार केल्याचे सांगितले व जगत्कल्याणासाठी मुलांना निरोप द्यावा, असे विनवून सांगितले. नरनारायण ऋषी मुलांचा व मातांचा निरोप घेऊन तीर्थयात्रा व तपाचरणास निघून गेले. वसिष्ठ ऋषी सरस्वती नदीचे काठी वास्तव्यास निघून गेले व अत्री नर्मदेच्या काठी आश्रम बांधून जगतोद्धार करण्यास निघून गेले.

अगस्त्यींना अंतर्ज्ञानाने विदर्भाची राजकन्या आपली भार्या होणार आहे असे कळले. त्यांनी त्या राजकन्येस मागणी घालण्यासाठी कुंडिनपूर नगरीला गेले व तेथील राजाजवळ राजकन्येसाठी विवाहाप्रीत्यर्थ लोपामुद्रेची मागणी केली. आपल्याबद्दल सर्व माहिती राजाला व लोपामुद्रेला सांगितली. लोपामुद्रेने अगस्त्यीला स्पष्टच सांगितले, 'मुनिवर्य, आपण शिक्षणाने व संस्काराने वंद्य झाला आहात, हे खरे; परंतु विवाहासाठी एवढ्याच गोष्टी पुरेशा नसतात. येथे दोन जीवांचे सर्व जन्मजन्मांतराचे बंधन असते. विवाहाने दोघे स्त्री-पुरुष जन्मभरासाठी, संस्कारबद्ध, सहवासबद्ध व वैचारिक आचाराने समान पातळीचे होऊन कायमचे बांधील राहतात. त्या दोघांच्याही स्वभावाचे, सवयींचे, रुचींचे एकमेकांना आकलन होऊन परस्परांना योग्य असले पाहिजे व त्यात कोणाचीही कुंचबणा होऊ नये, पस्तावा करावा लागू नये यासाठी सर्व तऱ्हेने परिपूर्ण एकमेकांचे आकलन करून घेऊन पूर्ण विचार करण्याची जरुरी आहे. आपण ऋषी जन्मापासून निष्कांचन, निर्वैभवात राहता. मी राजाची कन्या असून सुखात, लाडात, वैभवात वाढले. हरकामी दासदासी आहेत. मला कोणताही त्रास सोसण्याचे माहीत नाही. मी आजपर्यंत जसे जीवन व वैभव भोगले तशातऱ्हेने जीवन व वैभव मला प्राप्त करून देण्याची कुवत मिळवा, स्वत:चा स्वभाव माझ्यायोग्य बनवा व मगच माझ्या पाणिग्रहणाची अपेक्षा करा. मी तुम्हाला १ वर्षाची मुदत देते. तेवढ्या अवधीत मजयोग्य वैभव मिळवून आणा.

मग मी तुमच्या मागणीचा स्वीकार करेन.'

**वातापीची कथा**

याप्रकारे लोपामुद्रेचे भाषण ऐकून अगस्त्यी राजवाड्याबाहेर पडला व वर्षात वैभव मिळवून लोपामुद्रेबरोबर विवाह करण्याचा निश्चय करून निघाला. काही दिवसांनी मणिमूर्तीचे इत्वल-वातापी या नरसंहार करणाऱ्या राक्षस राजद्वयांची माहिती समजली. मोठमोठ्या ऋषी, ब्राह्मण, राजे, प्रधान वगैरे मान्यवर व्यक्तींना आपला पाहुणचार घेण्यासाठी बोलावीत. भोजनासाठी चंदनी पाट, सुवर्णाचे ताट, वाट्या, रंगावल्या काढून त्या व्यक्तीचा सत्कार करीत असे. तुम्हाला भरपूर, द्रव्य देऊ वगैरे सांगून भोजनाला बसवीत. इत्वल, वातापीला मानून त्याच्या मांसाचे भोजन पाहुण्यांना घालीत असे व भोजन झाल्यावर इत्वल मंत्र म्हणून वातापीला बोलवत असे.वातापी जिवंत होऊन त्या पाहुण्यांचे पोट फाडून बाहेर येत असे. अशा रीतीने ऋषी, ब्राह्मण, राजे वगैरे मान्यवरांना ही नराधम जोडी पाहुण्यांना ठार मारून त्यांचे मांसभक्षण करीत असत.

ही हकिकत अगस्त्यींना रुचली नाही. त्यांनी विद्वान, ब्राह्मण, ऋषी वगैरेंना संकटमुक्त करण्याचे ठरवून वातापी-इत्वलांच्या नगराला आले. येताना आपला कमंडलू भरून अतिशीघ्र पाचक रसायन बनवून बरोबर घेतले व राजांना येऊन भेटले. 'आपण अत्यंत विद्वान व नामांकित ऋषिवर असून काही महत्त्वाच्या कार्यासाठी धनाच्या इच्छेने आलो आहे.' असे त्यांनी सांगितले, राजांनी त्यांना भरपूर धनदौलत देऊ असे सांगून त्यांच्याकडून देवतापूजन व होम हवन करून घेतले. नंतर त्यांना नेहमीप्रमाणे भोजन वाढून सत्कार केला व भोजनास वातापीस मारून त्याचे मांस अन्नात वाढले. अगस्त्यी ऋषींनी ते भोजन जेवून लगेच कमंडलूतील रसायन प्यायले. भोजनानंतर बैठकीवर बसल्यावर इत्वलाने वातापीस हाक मारली. परंतु या वेळी वातापी येऊ शकला नाही. इत्वलाने २-३ वेळा मंत्र म्हणून हाक मारली. परंतु वातापी काही आला नाही.

इत्वल घाबरला. अगस्त्यी इत्वलाला म्हणाला, 'तू मला भोजन दिलेस. आनंद झाला. आता आपण बोलल्याप्रमाणे मला हवे ते धन द्यावे म्हणजे आम्हास प्रस्थान ठेवण्यास बरे पडेल.' इत्वलाची काही हालचाल दिसेना. शिवाय तो अतिभयभीत झाला. तेव्हा अगस्त्यीने त्याला म्हटले, 'इत्वला, तू तुझ्या भावाला वातापीला मारून मला त्याचे भोजन घातलेस व मंत्र म्हणून त्याला बोलावू लागलास. परंतु वातापीचे माझे उदरात केव्हाच पचन झालेले आहे. आता तो कसा परत येईल. तुम्ही आतापर्यंत अशा किती विभूतींना नष्ट केलेस? ही सर्व हकिकत मला कळली होती म्हणून तुमचे संकटनिवारण करण्यासाठी मी येथे आलो. वातापी तर आता पचला, आता तुझी पाळी.' असे ऐकल्यावर इत्वल राजा अगस्त्यीला भ्याला व गयावया करू लागला. अगस्त्यीने त्यांचेकडून अपरंपार धन घेतले व इत्वाला माकड बनवून वनात पाठवले. त्याचेकडून मिळालेले धन घेऊन अगस्त्यी लोपामुद्रेकडे आला. तोपर्यंत वातापी, इत्वलांचे पारिपत्य अगस्त्यीने केल्याची वार्ता लोपामुद्रा व राजा यांचे कानावर आलेली होती. लोपामुद्रेला अगस्त्यीचे सामर्थ्य समजून आले व तिने विवाहाला संमती दिली. विदर्भाच्या राजाने लोपामुद्रा-अगस्त्यीचा विवाह करून दिला. विवाह सिंधू नदीच्या काठी सिंधी महत्तीर्थ येथे संपन्न झाला. राजाने या दांपत्याला भरपूर धन, दास-दासी देऊन बोळवण केली.

**विवाह**

उत्तरेकडे जात असताना अगस्त्यीला प्रेरणाविद्येने शिव-सतीच्या विवाहाचे आमंत्रण मिळाले. त्यासाठी अगस्त्यी-लोपामुद्रेसह वाराणसीला विवाह समारंभासाठी गेले. दक्ष प्रजापतीने अगस्त्यी-लोपामुद्रेचे स्वागत केले. तेथे जमलेल्या सर्व मंडळींना नरनारायण ऋषींनी अगस्त्यीनी वातापि-इत्वलाचा नाश केल्याची व लोपामुद्रेशी विवाह केल्याची वार्ता सांगितली. तेव्हा सर्वांना अगस्त्यीचे सामर्थ्य समजले व आनंद झाला.

या शिव-सतीच्या विवाहात अगस्त्यी, विश्वामित्र,

अत्री या गुरुबंधूची गाठ पडली व सर्वांना आनंद झाला. अनुसया व अरुंधती यांचीही ओळख होऊन प्रेमाच्या गाठीभेटी झाल्या. या समारंभास दक्षिणेतील मदुरेचा पांश राजा आला होता. त्याने अगस्त्यींना मदुरेला येऊन पांश राज्यांच्या पुरोहिताच्या कार्याची धुरा स्वीकारावी म्हणून विनंती केली व महादेव शिवांनी त्याला मदुरेस जाण्याबद्दल सांगितले व शिवाच्या-गुरुच्या इच्छेला मान देऊन मदुरेला येण्याचे कबूल केले. पांश राजा विवाहानंतर लगेच आपल्या राज्याकडे गेला. अगस्त्यीच्या विवाहाचा सर्व सोहळा व त्यानंतरचा यज्ञ संपल्यावर अत्रि-अनुसया, वशिष्ठ-अरुंधती, उमा-सदाशिव, दत्तात्रेय ही सर्व मंडळी गेल्यावर मग लोपामुद्रेला घेऊन मदुरेसाठी प्रस्थान ठेवले.

**पायाची कहाणी**

मदुरेला जाण्याआधी अगस्त्यी लोपामुद्रेला घेऊन आपल्या कुंभ मातेला भेटून मदुरेला जाण्यासाठी अनुज्ञा घेतली. लोपामुद्रेसह मातेच्या पाया पडून आशीर्वाद घेऊन निघाला. तेथून तो लोपामुद्रेच्या मातापित्यांना भेटून त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी कुंडिनपुरास गेला. तेथे सर्वांच्या गाठीभेटी होऊन सर्व हकिकत निवेदन केली. भार्येच्या मातापित्यांचे समाधान करून आशीर्वाद घेऊन पुढे निघाला. जाता जाता वाटेत नरनारायण ऋषींच्या सांगण्यावरून खेल राजाच्या नगराला पोहोचला. राजाने त्याचा काही दिवस पाहुणचार घेऊन मग पुढे जा, म्हणून विनंती केली. राजाच्या शब्दाला मान देऊन अगस्त्यी भार्येसह ३-४ सप्ताह राहिला. तेवढ्यात राजावर युद्धाचा प्रसंग आला. राजाने अगस्त्यीस विनविले की, युद्धाचा प्रसंग संपवून येईपर्यंत माझे वतीने येथील राज्याचा कारभार पहावा. युद्धाचा प्रसंग संपवून आल्यावर आतिथ्य-सत्कार करू. तो स्वीकारून मग मदुरेसाठी प्रस्थान ठेवावे. राजावर आलेल्या प्रसंगाचे स्मरण ठेवून राजा युद्धावरून परत येईपर्यंत थांबण्याचे कबूल केले व अगस्त्यीने लोपामुद्रेसह आपला त्या नगरीचा मुक्काम वाढविला. राजा-राणी युद्धासाठी गेल्यापासून ७-८ दिवसांनी मध्यान्ही एक रथ युद्धक्षेत्राहून आला. त्यातून राणी आली होती. युद्धात राणीचा एक पाय तुटून गेला होता. सारथ्याने राणीचा तो तुटलेला पायही रथातून आणला होता. ही वार्ता सर्व नगरात पसरली. अगस्त्यीला ही वार्ता कळताच तो राणीच्या भेटीस आला. राणीला त्या स्थितीत पाहून त्याला अतिशय दुःख झाले. अगस्त्यीने ध्यान करून देववैद्य अश्विनीकुमारांचे दर्शन घेऊन हकिकत निवेदन केली व त्वरित त्या नगरीला येण्यासाठी विनंती केली. अगस्त्यीच्या आग्रहाच्या विनंतीने अश्विनीकुमार ताबडतोब त्या नगरीला आले व राणीची पाहणी केली व सविस्तर हकिकत ऐकली. तुटलेल्या पायाचेही अवलोकन केले व अगस्त्यीबरोबर चर्चा करून एक योजना केली. एक प्रहरात सर्व तयारी करण्याचे ठरवले. अर्ध्या घटकेत जवळच्या रानातून १ भारा एका पाल्याचा घेऊन आले व दोन स्त्रियांना त्याचा रस काढण्यास सांगितले. पुन्हा इतर सामग्री आणण्यासाठी जाण्यापूर्वी त्या स्त्रियांना सांगितले की, 'त्या नीट ढवळून त्यामध्ये तो तुटलेला पाय टाकून ठेवा. शरीराच्या तुटलेल्या पायाच्या ठिकाणी रस काढून उरलेला पाला ठेव व पाय वस्त्राने बांधून टाका. आम्ही २ घटकेत येतो.' अगस्त्यीने वज्रलेप तयार करण्यास सांगितले व स्वतः इतर सामग्री आणण्यास निघून गेला.

अगस्त्यी रानात जाऊन १०-१२ प्रकारचे वनस्पतिजन्य सामान, २-३ प्रकारची माती व एक-दोन इतर द्रव्ये घेऊन आला व त्या सर्व सामानान्वये वज्रलेप तयार करून ठेवला. तेवढ्यात अश्विनीकुमार साहित्य घेऊन आले. एक-दोन दासींना दिमतीला राहण्यास सांगून दुसऱ्या दोघींना १-१ पातेले उकळते पाणी व तेल तयार ठेवण्यास सांगितले व बोलावल्यावर लगेच आणण्यास बजावले. अगस्त्यी व दोघी दिमतीला घेतलेल्या स्त्रियांना घेऊन राणीच्या महालात आला व या चौघांशिवाय इतरांना बाहेर जाण्यास सांगितले व महालाबाहेर पहारेकरी बसवून कोणासही आत न सोडण्याविषयी बजावले. एका स्त्रीस राणीचा तुटलेला पाय रसात ठेवला आहे तो तसाच घेऊन येण्यास सांगितले व उकळते पाणी व तेल आणवले. शस्त्रे

उकळत्या तेलात पाव घटका ठेवून दिली व पाण्यामध्ये एक-दोन भस्मे घालून त्या पाण्याने अगस्त्यी व कुमार दोघांनीही हात धुतले व राणीवरच्या उपचारकार्यास सुरुवात केली.

### यशस्वी शल्यक्रिया

प्रथम राणीला एकाग्रदृष्टीचा उपयोग करून पूर्णपणे भानरहित केले. शरीराची तुटलेली जागा व तुटलेला पाय तेलाने धुवून काढला. तुटका पाय व शरीराचा तुटलेला पायाचा भाग प्राण्याच्या शरीराच्या भागाचा बारीक दोरा वापरून पायाच्या दोन्ही तुकड्या न गंजणारी सळी उकळत्या तेलातून काढून तुकडे जोडले व वरील धाग्याने पाय शिवून टाकला व पाय एकसंध केला. त्यावर अगस्त्यीने बनवलेला लेप लावून वस्त्राने बांधून टाकले व भानरहित अवस्थेत राणीला झोपवले. हा सर्व उपचार एक-दीड घटकेत झाला. म्हणजे पाय तुटल्यापासून २-२$^{१}/_{२}$ प्रहरात राणीच्या पायावर उपचार झाला. यानंतर अगस्त्यीला पुढील उपचारांबद्दल सविस्तर माहिती देऊन अश्विनीकुमार स्ववजयीसाठी निघून गेले.

अगस्त्यी त्यानंतर २-२ प्रहरांच्या अंतराने लेप बदलत राहिला. राणी आल्यापासून अगस्त्यी राणीच्या सेवेत अखंड राहिला. रात्रभर विश्रांती मिळाल्यावर सकाळी राणी जागी झाली. तिला तुटलेल्या पायाला वस्त्र बांधलेले दिसले, बाकी काही फरक जाणवला नाही. घटकाभराने राणी अगस्त्यीच्या अनुमतीने उभी राहिली व २-३ पावले टाकली. पायाला थोडा ठणका होता, परंतु तो व्यवस्थित सांधला जाऊन शल्यकार्याची जखमही ४-५ प्रहरात बरी झाली. अगस्त्यीने राणीला सांगितले की, त्या दिवशी विश्रांती घेऊन दुसऱ्या दिवशी राजाकडे युद्धाला जाऊ शकतील. हा वज्रलेप २-२ प्रहरांनी फक्त बदलणे जरूर आहे. पण आधी मधमिश्रित दूध प्या व सबंध दिवसभर तोच आहार घ्या. अशा रीतीने राणीला तुटलेला पाय सांधून दोनच दिवसांत युद्धासाठी उभी केली.

यानंतर राजा ४-५ दिवसांनी राणीसह युद्धात विजयी होऊन आला. त्याला अगस्त्यीच्या पराक्रमाची वार्ता कळलेली होतीच. राजा-राणीला अगस्त्यीचा प्रसंग निभावून नेल्याबद्दल अतिशय हर्ष वाटला. त्यांनी अगस्त्यी व लोपामुद्रेचा मोठा सत्कार केली, पूजा केली, वस्त्रे-अलंकार दिले व अगस्त्यी लोपामुद्राबरोबर पांश राजाच्या राजधानीला आला. पांश राजाची गाठ पडून अगस्त्यीची पुरोहित पदावर नियुक्ती झालेली पाहून संतोष पावला व त्यांचा आशीर्वाद घेऊन नगरीस आला.

### समुद्राचा उल्लेख

अगस्त्यी मदुरेला आला व पाण्ड्य राजाने त्याचे उचित असे भव्य स्वागत केले. राजाने अगस्त्यीला पाण्ड्य राज्याचे पुरोहितपद स्वीकारण्याची विनंती केली व अगस्त्यीने ती स्वीकारली. पाण्ड्य राजा हा दक्षिण भारतातील मोठा सम्राट असून त्याचे साम्राज्य दूरवर पसरलेले होते. अगस्त्यी आला त्यावेळी साम्राज्य दूरवर पसरलेले होते. अगस्त्यी आला त्यावेळी पाण्ड्य राज्य आजचे केरळ, तामीळनाडू, आंध्रचा काही भाग, कर्नाटक पश्चिमेस मालदीव बेटे, लक्षद्वीप बेटे, पूर्व आफ्रिकेचा सोमालीलँड, सुदान, पूर्वेकडे, अंदमान निकोबार बेटे, मलाया, सिंगापूर, जावा सुमात्रा, बाली वगैरे बेटे, दक्षिणेस लंका येथपर्यंत पसरलेला होता. अगस्त्यी हा बुद्धिमान व कुशल संयोजक होता. त्याने पाण्ड्य सम्राटाला सांगितले, 'सर्व पाण्ड्य साम्राज्याची सुसूत्र प्रकारे व्यवस्था लावून त्यावर नियंत्रण ठेवण्यास मला काही कालावधी लागेल. आधी मी भारतावर समुद्रमांकित प्रदेशाची व्यवस्था करतो. नंतर २-३ वर्षांच्या कालावधीनंतर समुद्रपार असलेल्या प्रदेशाचे नियंत्रण करतो. त्यासाठी काही अन्य व्यवस्था निर्माण करावी लागेल. तोपर्यंत महाराजांनी समुद्रपार प्रदेशांची आज जशी व्यवस्था करीत आहात तीच चालू ठेवावी. अन्य व्यवस्था होईपर्यंत कदाचित जास्त कालावधी लागेल. तोपर्यंत मला व साम्राज्याला महाराजांनी सांभाळून घ्यावे.' राजाकडून अनुमती मिळाल्यावर अगस्त्यी लगेचच कार्याला लागला.

अगस्त्यीने प्रथम सर्व प्रदेशाचा दौरा करून पाहणी केली. प्रत्येक ठिकाणी जनतेच्या अडचणी, पाऊसपाणी, अन्न, औषधी वनस्पती, पाळीव जनावरे, रानटी जनावरे त्यांची निगा, जंगले व त्याची व्यवस्था या सर्वांची त्याने पहिल्या दौऱ्यात पाहणी केली व एक आराखडा तयार केला व अगस्त्यीने सर्व प्रदेशाची पहाणी करताना सर्व प्रदेशाचा इतिहास, भूगोल, सामान्य व्यवस्था, राज्याच्या व्यवस्थेची मांडणी, भाषा समाजातील माणसे व त्यांचे प्रमाण, बुद्धिमान, चारित्र्यसंपन्न, धैर्यवान, शूर, व्यवस्थाकुशल, कष्टकरी, यांचे प्रमाण या सर्वांची माहिती मिळवली.

या दक्षिण भारतात माताप्रधान समाजपद्धती आहे. सर्वसाधारणपणे कार-नाग वंशाचे लोक आहेत व त्यांनी पूर्वेकडील समुद्रपार देशातून सर्व संस्कृती व ज्ञान आणले आहे व तेच वंशपरंपरागत चालू आहे.

निरोप पाठवणे, हिशेब ठेवणे, हकिकती लिहून प्रदेशाचा इतिहास तयार करणे यासाठी काही कायमची व्यवस्था करणे जरूर आहे व त्याप्रमाणे माणसे शिकवून तयार करणे जरुरी आहे असे त्याला दिसून आले.

प्रथम अगस्त्यीने व लोपामुद्रेने येथील समाजाची भाषा शिकून घेतली व गणेश विद्येच्या आधाराने लिपी बनवून प्राथमिक गणित, हिशेब करणे व लिहिणे याचा शोध लावून ते ज्ञान बुद्धिमान स्त्रिया व पुरुषांना तयार करून अंगवळणी लावले. त्या तयार झालेल्या स्त्री-पुरुषांना निरनिराळ्या ठिकाणी पाठवनू पीठदेवता, नगरदेवता व त्यानंतर सर्व ग्रामदेवता या सर्वांना वरील गोष्टीत तयार करून सुधारणा करण्यास सांगितले व या सर्व स्त्री अधिकाऱ्यांना तयार केले. त्यांच्याकडून त्यांना कारभारासाठी सेवकवर्ग शिकवून तयार केला. अगस्त्यीने ३-४ महिन्यांत राज्य कारभारासाठी लागणारा प्राथमिक गणित, लेखन, वाचन यामध्ये तयार करून घेतला.

अगस्त्यीने तामीळ भाषा, त्याची लिपी व व्याकरण तयार केले व शिक्षण गुरूकडे देऊन शिष्यांना शिकवण्यास सांगितले. अगस्त्यीने समाजाची व राज्याची पूर्वीपासून चालत आलेली मातृसत्ताक पद्धती तशीच चालू ठेवली. एकदम पितृसत्ताकवर गेल्यास गोंधळ माजेल व शिवाय स्त्रिया थंड डोक्याने, प्रेमळपणे, सहानभूतीपूर्वक विचार करून कारभार करतात, व्यवस्थापन चांगल्याप्रकारे होते, हे पाहून मातृसत्ताक पद्धती तशीच चालू ठेवली. शिवाय महसुलाची पद्धत नामसंस्काराप्रमाणे अर्धेलीची पद्धत चालू ठेवली. व्यापारीवर्गाला उत्तेजन देऊन परप्रांताशी व्यापार करून संपत्ती व समृद्धी आण्यास लावले.

यानंतर त्याने समाजाच्या प्रकृतिस्वास्थ्य, नक्षत्रशास्त्र व इतर भौतिकशास्त्र, शेतीशास्त्र याकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. अनेक बुद्धिवान, चारित्र्यसंपन्न, नीतिमान मंडळी हुडकून काढून त्यांना ३-४ महिन्यांत तयार केले व आयुर्वेद वनस्पती व मृद्‌औषधे तयार करून राज्यातील रोगराई, आजारपण यांच्याशी मुकाबला शास्त्रशुद्ध रीतीने करण्यास शिकवले. त्यासाठी लागणारी साधनसामुग्री उत्पन्न करून वेळप्रसंगी उपयोगी पडावी म्हणून संस्कार करून साठवणूक करण्यास शिकवले. नक्षत्रविद्या व भौतिकविद्या यांचा स्थानिक व उत्तरेकडील ज्ञान यांचा मिलाफ करून कालमानपद्धती चालू केली व नवनवीन शोध, चंद्र व इतर ग्रह, तारे यासंबंधी अधिकाधिक ज्ञान संपादन करण्याची आवड निर्माण करून ज्ञानसंवर्धन व नवसंपादन यासाठी व्यवस्था केली. भौतिकशास्त्राच्या संवर्धन व नवसंपादन करण्यासाठी कार्यशाळा व पीठे निर्माण केली व त्यासाठी लागणारे लोक तयार केले.

नाग व कार लोकांच्या नौकाशास्त्राचा व सागरशास्त्राच्या ज्ञानाचा उपयोग करून त्यांना कार्यरत करण्यासाठी नौकाबांधणी, विदेश संचार, सागर वाहतूक यामध्ये आवड निर्माण करून उद्योगांना व व्यापाराला उत्तेजन दिले. कर्नाटक, केरळ, पश्चिम तामिळनाडू यामध्ये जंगल भरपूर असून उत्तमपैकी जहाजे बांधण्याजोगे लाकूड भरपूर मिळत होते. (इस्राएलने इ.पू.१०५० च्या सुमारास फोनेशियन व्यापाऱ्यांनी सालोमन राजासाठी आरमारी

जहाजे, व्यापारी जहाजे व जेरुसलेमच्या ज्यू लोकांचे देऊळ बांधण्यासाठी लाकूड, हस्तिदंत व रंगीबेरगी घडीव काती व दगड व फरशा मंगलोर बंदरातून जेरुसलेमला नेण्यात आले.) त्याचा उपयोग करून अगस्त्यीने जहाजे बांधणे व समुद्रपार व्यापार या गोष्टींना महत्त्व देऊन राज्याच्या व जनतेच्या धनवर्धनच्या कामास उत्तेजन दिले. अगस्त्यीने नद्या, नाले, ओढे यांना बंधारे घालून पाणी अडवून जनतेस सोय करून दिली. शेती करणाऱ्यानी या बनवलेल्या असंख्य तलावांतून शेतीसाठी पाणी उपसून उत्पन्न वाढवावे, म्हणून सांगितले. त्यामुळे जनतेला पाण्याची सोय झाली, कूप व विहिरींना पाणी वाढले. समाजपद्धती व राज्यपद्धती मातृसत्ताक असल्याने न्यायदान भारतीय प्रदेशाचा कारभार पाहण्यास लोपामुद्रेस सांगून आपणास समुद्रपार प्रदेशाचा कारभार व नवनवीन कार्यशाळा, शोधशाळा, नक्षत्रशाळा या मौलिक कामांसाठी स्वत:च मोकळे करून घेतले.

**मौलिक शोधकार्य**

शोधशाळेत त्याने सौरकिरणापासून सरळ विद्युतऊर्जा बनवणारे घट तयार केले व या विद्युतउर्जेने सागरी पाण्याचे विघटीकरण करून ऑक्सिजन व हैड्रोजन मिळवण्याचे व त्याचे फुगे (कापडी) भरून ठेवण्याचे कार्य सुरू केले. सागरात वास्तव्य करणाऱ्या असंख्य राक्षसांच्या त्रासापासून मुक्त होऊन प्रवास निर्धोक व अतिजलद होण्याच्या दृष्टीने अगस्त्यीने विद्युत, ऑक्सिजन व हैड्रोजन यांच्या सहाय्याने हवेतून जलद गतीने प्रवास करणारी विमाने तयार करून समुद्रपार असलेल्या पांश राज्याची पाहणी व व्यवस्थापन करण्यासाठी विमाने वापरू लागला.

१) तंजावरच्या ग्रंथसंग्रहालयात आजही अगस्त्यीची विमानशास्त्र म्हणून पोथी तामीळ भाषेत हयात आहे. (भाषा जुनी, प्राचीन तामीळ आहे.) विमानांसाठी इंधन, सागरपाण्यापासून मिळालेले ऑक्सिजन, हैड्रोजन व विद्युतघटातून मिळणारी विद्युत यांच्या सामुदायिक कारणांनी मिळणाऱ्या ऊर्जेवर अगस्त्यीची विमाने चालत असत. त्यासाठी अगस्त्यीने बरेच सागरी पाणी वापरून संपवले यावरून अगस्त्यीने समुद्र प्यायल्याची कथा रचून जगाला सांगितली.

या सर्व हकिकतीवरून अगस्त्यी हा ऋषी होता. (पंडित मधुसूदन ओझा यांनी ऋषी म्हणजे वैज्ञानिक व वेद म्हणजे ज्ञान अशी व्याख्या केली आहे व ती अगदी खरी असल्याचे प्रत्ययाला येते.)

अगस्त्यी हा रसायन शास्त्रज्ञ असून इंजिनीयर होता. अलीकडच्या विश्वेश्वरय्याप्रमाणे तो एक द्रष्टा असून बुद्धिमान शास्ता होता. चतुरस्र योजक होता. अगस्त्यी वनस्पतितज्ज्ञ असून उत्तम वैद्यकही होता. इतक्या गुणी व कीर्तीवंत ऋषीची फार माहिती नाही, कारण सर्व नामांकित ऋषींपासून लांब दक्षिण भारतात येऊन जगत्वंद्य कार्य केले. पण ही हकिकत सर्व त्यावेळच्या नामांकित ऋषींना माहीत नव्हती.

अगस्त्यीने विमानाची निर्मिती करून भारतापासून दूरवर समुद्रपार असलेल्या पाण्ड्य साम्राज्यातील प्रदेशाची पाहणी व कारभार दर सहा महिन्यांनी एकदा सर्व सागरपार प्रदेशांना भेट देऊन आपले शिक्षित अनुभवी प्रतिनिधी नेमून उत्तम कारभार केला. सर्व प्रदेशाला उन्नत करून सुफल करून ठेवले. त्याला सर्व शास्त्रात, साहित्यात, कार्यात चांगली गती होती म्हणून अगस्त्यीला पाण्ड्य साम्राज्यातील शिल्पकार म्हणून तामीळ वाङ्मयाने गौरवले आहे.

अगस्त्यीने दर चार वर्षांने मदुरेत महासभा भरवून सर्व साम्राज्यातील खालील विषयात अग्रेसर असणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरवण्याचा कार्यक्रम सुरू केला. हे पुरस्कार आजच्या नोबल पारितोषिकाच्या तोडीचे होते. त्यामुळे जनतेत उत्साह निर्माण होऊन उत्तमोत्तम नामांकित व्यक्ती निर्माण होण्याची परंपरा निर्माण झाली.

१) सर्वात उत्तम कथा, २) सर्वात उत्तम काव्य, ३) सर्वात उत्तम न्याय, ४) सर्वात उत्तम वैद्यक, ५) सर्वात उत्तम वैय्याकरणी, ६) सर्वात उत्तम रसायनतज्ज्ञ, ७) सर्वात उत्तम नक्षत्रशास्त्री, ८) सर्वात उत्तम खेळाडू, ९) सर्वात

उत्तम योद्धा, १०) सर्वात उत्तम सेनापती, ११) उत्तम कारागीर उत्पादक, १२) सर्वात उत्तम गायक, १३) सर्वात उत्तम वादक, १४) सर्वात उत्तम नृत्यपंडित, १५) सर्वात उत्तम कलाकार, १६) सर्वात उत्तम राज्यव्यवस्थापन, १७) सर्वात उत्तम अभिनय, १८) सर्वात उत्तम नाटक, १९) सर्वात उत्तम उद्योजक

आणखी एका कार्याचा उल्लेख करून अगस्त्यीची प्रशंसा करण्याची इच्छा होत आहे. अगस्त्यीने नक्षत्रशाळा सुरू करून साम्राज्यातील बुद्धिमान लोकांना या शाळेत ज्योतिषशास्त्राची माहिती देऊन त्या शास्त्रात शिक्षण देऊन निष्णात व्यक्ती निर्माण करण्याची परंपरा निर्माण केली. या विषयात त्यांच्याबराबेर रस घेऊन, चिकित्सा करून, आकाशातील ग्रह, तारे, तारका, हवामान, वारे यांपासून होणारे सृष्टीवरील बदल यांच्या अभ्यासात गती दिली.

**समारोप**

अगस्त्य ऋषींची व त्यांच्या वैज्ञानिक कामाची आजच्या लोकांना म्हणावी तशी कल्पना नाही. त्यामुळेच या लेखात हा अल्पसा प्रयत्न केला आहे.

**अनंत हरी पटवर्धन**
३०-ए, श्रीरंग सहनिवास,
ठाणे - ४०० ६०१.
दूरध्वनी : २५३४ २२८७

**दिशा नियमित वाचा.**

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

(पान क्र.३१वरून)

## संथ सलील मंद लहर - मधुकर रामचंद्र देवधर

वास्तवतेची जाणीव करून देतात. हा काव्यसंग्रह वाचताना कवीच्या प्रतिभेला व निरीक्षणशक्तीला विशेष दाद द्यावीशी वाटते. फक्त खाजगी वितरणासाठी आणि रसिकांसाठी प्रकाशित केलेल्या या काव्यसंग्रहाचे कोणतेही व्यावहारिक मूल्य नाही. कारण यातील प्रत्येक कविता अनमोल आहे. रसिकांची आतून आलेली दाद हीच खरी या काव्यसंग्रहाची किंमत होय ! श्री. मधुकर देवधर यांचा संपर्काचा पत्ता -

**श्री. मधुकर रामचंद्र देवधर**
कलाविहार, प्रशांतनगर,
नौपाडा, ठाणे (प.)
दूरध्वनी : २५४०३४६०

**- गीतेश गजानन शिंदे**
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉलजवळ,
टेंभी नाका, ठाणे (प.)- ४०० ६०१.
दूरध्वनी : २५३७ ९५१९

### उल्लेख

मार्चच्या अंकातील 'शब्दकोशांवरील लेख' हा वर्षा जगदाळे यांच्या प्रबंधातील प्रकरण आहे. ग्रंथालयशास्त्रातील निष्णात परीक्षेसाठी त्यांनी हा प्रकल्प सादर केलेला होता. या प्रकल्पासाठी त्यांना आमचे स्नेही डॉ. प्रकाश करमरकर यांचे मार्गदर्शन लाभले होते. अनवधानाने हा उल्लेख राहून गेला.

**- कार्यकारी संपादक**

# परिसर वार्ता

दि. ५ मार्च २००४ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात दुपारी तीन वाजता तृतीय वर्षीय विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. एस्.ए. सोमण (आय.आय.टी., मुंबई) उपस्थित होते.

हा कार्यक्रम आय.एस्.टी.ई. स्टुडंटस् चॅप्टरतर्फे आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्य श्री. मुजुमदार व उपप्राचार्य श्री. नायक यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात उपयोगी पडेल असे मार्गदर्शन केले. श्री. एस्.ए. सोमण यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. स्टुडंडस् प्रेसिडेंट श्रेयस झिंगरे आणि धवल पारेख यांनी वर्षभरातील कार्यक्रमाची थोडक्यात माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनीषा येवले यांनी केले होते. आय.एस्.टी.ई. सेक्रेटरी, प्रा. सुषमा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे श्री. एस्.ए.सोमण यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट देण्यात आली.

तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी केलेले प्रोजेक्टचे प्रदर्शन बघताना त्यांची वर्षभरातील मेहनत जाणवत होती. स्टेडियम लाइटस्, एस्केलेटर, कॉम्प्युटराईज्ड लॉकर सिस्टिम, लायब्ररी मॅनेजमेंट, वॉटरकूलर विथ रिमोट असे विविध प्रोजेक्ट बघताना विद्यार्थ्यांचे कौतुक वाटले. सर्वांना हे प्रोजेक्ट विद्यार्थी समजावून सांगत होते. प्रत्यक्षातही उपयोगी पडतील, असे हे प्रोजेक्ट बघताना पुढील उद्योजक दृष्टीपथात येत होते.

**- संकलित**

*॥श्री॥*

*मा. संपादक*

*दिशा*

*स.न.*

*'दिशा'चा प्रत्येक अंक संग्राह्य आहे. श्री. मठ, श्रीमती आशाताई भिडे अशा अनुभवी लेखकांचे लेख मनाला भावतात, विचारप्रवृत्त करतात. शिक्षण संस्थेचा हा उपक्रम (खरे तर एकमेव संस्था असावी) अतिशय स्तुत्य आहे.*

*आपले संपादकीयही अल्पाक्षरी, पण अंतर्मुख करणारे असते. 'पहाटचिमटी आणि ओंजळीभर दाणे' हे संपादकीय मला विशेष आवडले होते. हा साहित्याबरोबरच विज्ञान शिकविणाऱ्या प्राध्यापकांचे विज्ञानविषयक चिंतन आपण प्रकाशित केले तर अधिक बरे होईल, असे माझे मत आहे.*

*कळावे,*

***वैभव नामजोशी***
*१३-ब, सायुज्य सोसायटी,*
*मुरबाड रोड,*
*कल्याण (प.)*

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

## • विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था •

१) डॉ. बेडेकर प्राथमिक विद्यालय (मराठी माध्यम)

२) डॉ. बेडेकर माध्यमिक विद्यालय (मराठी माध्यम)

३) सौ. आनंदीबाई जोशी प्राथमिक (इंग्रजी)

४) सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक (इंग्रजी)

५) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

६) ना. गो. बेडेकर वाणिज्य व के. ग. जोशी कला महाविद्यालय

७) टी. एम्. सी. विधी महाविद्यालय

८) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

९) व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था

१०) प्रगत अभ्यास केंद्र

## उपक्रम

भावे व्याख्यानमाला

व्ही.पी.एम्. दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे**

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा.

संपर्क

कार्यवाह,

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

**दूरध्वनी : २५४२ ६२७०**



हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.